दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २३१ | गुरूवार ४ जून २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ७१

## आता तुम्ही जागृत व्हावं...

तुमचं लक्ष परमेश्वराकडे वेधलं पाहिजे. काही नाही, आम्ही जातो की हनुमानाला. एखादा नमस्कार घातला की झालं. सकाळी जातो ना! बरं बुवा झालं. पुष्कळ झालं. आम्ही नमस्कार तर करतो. आहे आमचा विश्वास हं परमेश्वरावर! अगदी उपकारच आहेत परमेश्वरावर सगळ्यांचे! अहो, तुम्हाला काही मिळवायचं आहे की नाही. सहजयोग्यांचं मुख्य कार्य म्हणजे असं आहे, की प्रकाश मिळाला दिव्याला, तर तो काय करतो? सहजयोगानंतर मग काय करायचं? प्रकाश द्यायचा असतो. किती लोकांना प्रकाश दिला आम्ही? केवढा सुगंध आहे तुमच्यात. केवढा आनंद आहे तुमच्यामध्ये! तो वाटला का तुम्ही का स्वत:च आनंदात बसले. माझी साधना चांगली असली म्हणजे झालं. ‘मी साधना खूप करतो माताजी, माझ्या घरी बसून. आणि काहीच प्रगती होत नाही.’ होणार कशी? पसरायला पाहिजे नां! जोपर्यंत कलेक्टिव्हिटी येणार नाही, जागतिकता येणार नाही, सार्वभौमिकता येणार नाही, तोपर्यंत तुमच्या सहजयोगाला काहीही अर्थ नाहीये. अगदी बेकार आहे. जंगलामध्ये जर एखादं फूल आलं, आणि त्याला कितीही सुगंध असला, तरी त्याचा काय उपयोग आहे? तेव्हा सर्व समाजामध्ये, सर्वसाधारण लोकांमध्ये ही वार्ता जायला पाहिजे. बोलायला पाहिजे, सांगायला पाहिजे, की आम्ही सहजयोगी आहोत. तुम्ही आपली कुंडलिनी जागृत करून घ्या आणि पार होऊन घ्या. ह्या महाराष्ट्र भूमीचे एवढे पुण्य आहे! संत भूमीच नाही, अष्टविनायक इथे ठाकलेत. अशा ह्या संतभूमीमध्ये लोकांचं लक्ष आहे कुठे? म्हणजे तुम्ही आहात काय? आणि कोण आहात? इकडे लक्ष द्या. तुम्ही परमेश्वराचे पुत्र आहात. विशेष करून तुम्हाला परमेश्वर त्याचे साम्राज्य द्यायला बसलेला आहे. ते सोडलं एकीकडे आणि भलत्या ठिकाणी कुठे लक्ष घातलं आहे तुम्ही.

०६ डिसेंबर १९८०, मुंबई अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# श्रीरामपुरात देशद्रोही षड्यंत्र..?

## पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या थेट संपर्कात असलेल्या तिघांना ‘एटीएस’ने उचलले!

- शहरात ७ ते ८ ठिकाणी मध्यरात्री ‘दहशतवाद विरोधी पथका’चे एकाच वेळी छापे!
- सोशल मीडियावरून शेजार भाटी आणि पाकिस्तानी गँगस्टरशी संधान; चौकशीत एका अल्पवयीन मुलाचाही समावेश!
- हिंदुत्ववादी नेते आणि कार्यकर्त्यांची ‘रेकी’ केल्याच्या संशयाने खळबळ; मोबाईलमधील धक्कादायक डेटा सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर : एकेकाळी शांत आणि सुसंस्कृत शहर म्हणून ओळख असलेल्या श्रीरामपूर शहराला आता थेट पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या नेटवर्कचे ग्रहण लागल्याची धक्कादायक आणि अत्यंत चिंताजनक माहिती समोर आली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर शहजाद भाटी आणि इतर दहशतवादी टोळ्यांच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने श्रीरामपुरात तुफानी छापेमारी केली आहे.**

या धडक कारवाईत तीन संशयित तरुणांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी सुरू करण्यात आली असून, यामध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश असल्याने सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईला अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी अधिकृत दुजोरा दिला.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीरामपूरमधील काही तरुण गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडियाच्या विविध माध्यमांतून पाकिस्तानात बसलेल्या देशद्रोही आणि गँगस्टरांच्या संपर्कात होते.

पाकिस्तानातून मिळालेल्या थेट डिजिटल सूचनांनुसार, या तरुणांनी शहरातील काही संवेदनशील भागांची आणि प्रमुख घरांची ‘रेकी’ (पहारा व पाळत) केल्याची प्राथमिक माहिती एटीएसला मिळाली होती. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या संशयितांच्या निशाण्यावर शहरातील काही प्रमुख हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि नेते होते, अशी जोरदार चर्चा आता शहरात सुरू झाली आहे. या तरुणांनी नेमका कोणाचा गेम प्लान आखला होता, याचा छडा लावण्यासाठी एटीएसचे पथक सखोल तपास करत आहे.

### गँगवार, वाळूतस्करी अन आता थेट ‘पाकिस्तान कनेक्शन’!

**या आंतरराष्ट्रीय स्तरावरील देशद्रोही कारवाईची वार्ता श्रीरामपूर शहरात पसरताच संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. आधीच स्थानिक गँगवार, भाईगिरी, वाळूतस्करांची दहशत आणि रोज वाढणाऱ्या गुन्हेगारीमुळे श्रीरामपूरची शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आली होती. त्यातच आता थेट ‘पाकिस्तान कनेक्शन’ आणि दहशतवादी कटकारस्थानांचे धागेदोरे शहरात सापडल्याने सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### मोबाईल तपासताच फुटला घाम; डेटा जप्त!

एटीएसच्या मुंबई, नाशिक आणि स्थानिक पथकांनी काल पहाटेपासून श्रीरामपूर शहरातील तब्बल ७ ते ८ संशयास्पद ठिकाणांना वेढा घालत एकाच वेळी छापे टाकले. संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या मोबाईलची कसून तपासणी करण्यात आली. या मोबाईलमधील चॅट्स, ऑडिओ क्लिप्स आणि सोशल मीडियाचा आक्षेपार्ह डेटा पाहून तपास अधिकाऱ्यांचेही डोळे पांढरे झाल्याचे समजते. एटीएसने संशयितांचे मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे पुढील फॉरेन्सिक तपासासाठी जप्त



केले असून, त्यांचा पाकिस्तानातील देशद्रोह्यांशी असलेला डिजिटल संबंध पूर्णपणे उघड करण्यासाठी युद्धपातळीवर तपास सुरू आहे.

# महागाईविरोधातील आंदोलन आक्रमक

## रोहित पवारांसह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** सातत्याने वाढणारी महागाई, इंधन दरवाढ आणि बेरोजगारीच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आक्रमक झाली असून, बुधवारी नवी मुंबई येथे पक्षाच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला काही वेळातच आक्रमक वळण मिळाल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत आम दार रोहित पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

सर्वसामान्य नागरिकांचे जीवन वाढत्या महागाईमुळे असह्य झाले असून, केंद्र आणि राज्य सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला. महागाईमुळे घरगुती बजेट कोलमडले असून बेरोजगारीमुळे तरुण वर्ग हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने



रस्त्यावर उतरून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. महागाईचा निषेध नोंदवण्यासाठी काही कार्यकर्त्यांनी भांडी वाजवून आंदोलन केले, तर काहींनी रस्त्यावरच चूल पेटवून भाकरी थापत अनोख्या पद्धतीने सरकारचा निषेध **(पान ४ वर)**

**■ आंदोलनाची तीव्रता वाढत गेल्यानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कारवाई सुरू केली. यावेळी पोलिसांनी आमदार रोहित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. महिला कार्यकर्त्या सक्षणा सलगर आणि रोहिणी खडसे यांनाही पोलिसांनी अटक करून पोलिस वाहनातून नेले. या कारवाईदरम्यान काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**

## महत्त्वाचे..

### एमडी ड्रग्ज कारखान्यावर छापा; ६ कोटींचा मुद्देमाल जप्त

मुंबई – मिरा भाईंदर–वसई विरार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा क्र. ४ ने तेलंगणात सुरू असलेला एमडी (मेफेड्रोन) हा अम ली पदार्थ तयार करण्याचा कारखाना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे तीन किलो एमडीसह हजारो लिटर रासायनिक पदार्थ जप्त करण्यात आले असून, जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे सहा कोटी रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यापूर्वी एप्रिल महिन्यात मिरा रोडच्या नयानगर परिसरात राहणाऱ्या फिरदोस अरबाज कुरेशी हिच्या घरावर छापा टाकून पोलिसांनी एक किलो ३२४ ग्रॅम एमडी जप्त केले होते. त्याची किंमत २ कोटी ६६ लाख १७ हजार २८० रुपये इतकी होती. या प्रकरणाच्या पुढील तपासात मिरा रोड, आग्रीपाडा, मालवणी आणि मनोरी परिसरातून एमडी निर्मितीसाठी लागणारे रसायन व लॅब साहित्य असा तब्बल १३.६५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## कृषी विद्यापीठातील कंत्राटी कामगाराचा खून

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ परिसरात कंत्राटी कामगार असलेल्या २६ वर्षीय तरुणाचा



धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २ जून) सायंकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे विद्यापीठ परिसरासह तालुक्यात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मृत तरुणाचे नाव कैलास पोपट दोंदे (वय २६, रा. गोटुंबे आखाडा) असे आहे. तो म हात्मा फुले कृषी विद्यापीठात कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होता. मिळालेल्या माहितीनुसार, विद्यापीठ परिसरातील ‘कॉटन तळे’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात अज्ञात व्यक्तीने त्याच्यावर धारदार शस्त्राने तोंडावर व पायावर सपासप वार केले. या **(पान ४ वर)**

**वेगाने फिरविली आहेत.**
**घडलेल्या घटनेमधील तरुणाचा अत्यंत क्रूरपणे खुन करण्यात आला आहे. सदर घटने संदर्भात राहुरी पोलिसांनी योग्य ती पावले उचलली असून घटनेतील गुन्हेगारांचा पोलीस कसून तपास घेत आहेत. गुन्हेगारांच्या तपासासाठी पोलीस पथके विविध ठिकाणी पाठविण्यात आली आहेत. लवकरच या घटनेतील गुन्हेगारांना गजाआड करू.**
**–संजय ठेंगे पोलीस निरीक्षक, राहुरी.**

# खंडाळ्यात मॅकेनिकल इंजिनिअर मुलाने केला बापाचा निर्घृण खून

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर / खंडाळा :** लहानपणापासून लहान भावाला तुम्ही जीव लावता यांचा राग मनात धरून बी. ई. मॅकेनिकल इंजिनिअर पदवी असणाऱ्या मुलाने आपल्या जन्मदात्या वडिलांच्या डोक्यात धारदार टिकाव घालून त्यांचा निर्घृण खून केल्याची खळबळजनक घटना बुधवारी ( दि.३) जून रोजी खंडाळा येथे घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळे शेजारी रहिवासी मनोरुग्ण असलेल्या मुलाकडून वडिलांचा निर्घून खून करण्यात आल्याची घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सकाळी सचिन प्रभाकर ढोकचौळे (वय ५५ वर्षे) हे त्यांच्या घरात रक्ताच्या थारोळ्यात पडले असल्याचे वृत्त गावभर पसरले होते. त्यानंतर त्यांच्या घराकडे मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.पोलीस घटनास्थळी आल्यानंतर मयत सचिन प्रभाकर ढोकचौळे हे घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते तर, त्यांचा संशयित मुलगा प्रणव सचिन ढोकचौळे हा घरीच थांबून होता.मयत सचिन प्रभाकर ढोकचौळे यांचा अविवाहित मुलगा प्रणव सचिन ढोकचौळे (वय २५) याने कौटूंबिक वादातून टिकावासारख्या टनक हत्याराने डोक्यावर वार करून हत्या केली.आरोपी प्रणव हा मनोरुग्ण असून, त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे सागितले जाते.त्यावेळी आपल्या हातातून काहीतरी घडलयं तरी देखील आरोपी प्रणव हा गुन्हा केल्यानंतर घटनास्थळी थांबून होता.त्यावेळी प्रथमदर्शनी पोलिसांनी आरोपीकडे चौकशी केली असता मीच खून केल्याचे कबूली दिली. मयताच्या पश्चात आई–वडील, पत्नी, दोन मुले, असा परिवार आहे.घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे,पोलीस निरीक्षक नितीन देशमुख,फॉरेन्सिक पथक आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले.

आरोपीला ताब्यात घेण्यात आले.पोलिसांनी हत्यार देखील ताब्यात घेण्यात आले आहे.भारती ढोकचौळे या अशोक कारखान्यात क्लार्क म्हणून नोकरीस असल्याची समोर आली असून ढोकचौळे यांना दोन मुले असून प्रणव व संकेत असे मुलाचे नाव आहेत. याप्रकरणी भारती सचिन ढोकचौळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रणव सचिन ढोकचौळे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख करीत आहेत.



मृत सचिन ढोकचौळे



आरोपी प्रणव ढोकचौळे

### सध्या मानसिकता उरली नाही

**या भयानक घटनेने खंडाळा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष सुशिक्षित असणाऱ्या ग्रॅज्युएट असलेल्या मुलाने अशाप्रकारचे कृत्य किरकोळ रागातून केले आणि चक्क बापालाच जिवे मारल्याचा प्रकार घडला. सध्याची पिढी वाया चालेली असून याला मोबाईल जबाबदार असल्याचे बोलले जाते.यातच अतिवापरांचा प्रमाण होत आहेत.**

## दिल्लीत अग्नितांडव

### जीव वाचवण्यासाठी खिडक्यांतून उड्या, २१ जणांचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** बुधवारची सकाळ दिल्लीच्या मालवीय नगर परिसरासाठी काळरात्र ठरली. रोजप्रमाणे आपापल्या कामात व्यस्त असलेल्या नागरिकांना अचानक धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या ज्वाळांनी हादरवून सोडले. मालवीय नगरमधील एका बहुमजली इमारतीत असलेल्या ’लेमन ग्रीन’ रेस्टॉरंटमध्ये भीषण आग लागून तब्बल २१ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. या दुर्घटनेत जीव वाचवण्यासाठी काहींनी इमारतीच्या खिडक्यांतून आणि गच्चीवरून उड्या मारल्याचे हृदयद्रावक दृश्य नागरिकांनी पाहिले.

सकाळी सुमारे नऊच्या सुमारास आगीची माहिती मिळताच अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. धुराने संपूर्ण इमारत वेढल्याने आत अडकलेले लोक मदतीसाठी आर्त हाका मारत होते. काहीजण खिडक्यांना लटकून जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होते, तर काहींनी धाडस करून खाली उड्या मारल्या. परिसरातील नागरिकही मदतीसाठी धावले. अनेकांनी जखमींना बाहेर काढून रुग्णालयात पोहोचविण्यास हातभार लावला.

अग्निशामक दलाच्या दहा गाड्या, वॉटर टेंडर, वॉटर बाउझर आणि विशेष बचाव पथकांनी अनेक तास अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मि ळवले. बचावकार्यादरम्यान तळघरात अडकलेल्या काही जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. ४० हून अधिक लोकांची सुटका करण्यात आली असून अनेकांवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये काही परदेशी नागरिकांचाही समावेश **(पान ४ वर)**

# राहुरीसह नेवासा परिसरातही अन्नभेसळविरोधी प्रशासनाची धडक कारवाई

## संशयित आईस्क्रीम व खाद्यतेलाचा सुमारे २.८४ लाखांचा साठा जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेला आता अधिक गती मि ळाली असून राहुरी आणि नेवासा तालुक्यात अन्न सुरक्षा विभागाने धडक कारवाई करत संशयित आईस्क्रीम व खाद्यतेलाचा तब्बल २ लाख ८४ हजार १८० रुपयांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत असून नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या



आस्थापनाची तपासणी करताना पथकाने शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम, गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले. उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने ४१ हजार ४४० रुपये किमतीची १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आली.

दरम्यान, नेवासा येथील कडू गल्ली परिसरातील संतोष किराणा स्टोअर्समध्ये तपासणीदरम्यान एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन तेलाचा नमुना घेण्यात आला. सदर साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे तब्बल १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार आणि सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही मोहीम राबविण्यात येत आहे. अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, उ. र. पाटील आणि सहायक आयुक्त अन्न अ.अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या.

सहायक आयुक्त अ.अ. भोईटे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, बाजारात उपलब्ध अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका वाटल्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि भेसळमुक्त अन्न मिळावे यासाठी जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम सुरू असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

अन्नभेसळविरोधातील या कारवाईमुळे ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन अधिक सजग झाल्याचे दिसून येत असून व्यापाऱ्यांनाही अन्नसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचा इशारा मिळाला आहे.



# कांद्याचे सडके राजकारण आणि शेतकऱ्यांची फरफट




महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेत ऊस, कापूस आणि सोयाबीनबरोबरच कांद्याला विशेष महत्त्व आहे. विशेषतः अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि सोलापूर या पट्ट्यातील लाखो शेतकऱ्यांचे अर्थकारण कांद्यावर अवलंबून आहे. मात्र दुर्दैवाने कांदा हे पीक जितके महत्त्वाचे, तितकीच त्यासंबंधीची सरकारी धोरणे विसंगत, धरसोडीची आणि अल्पकालीन राहिली आहेत. परिणामी, कांद्याचे उत्पादन करणारा शेतकरी आजही बाजारातील अनिश्चितता, भावातील चढउतार आणि सरकारी निर्णयांच्या फटक्यांमध्ये भरडला जात आहे.

राज्य सरकारने १२ ... २०२५ रोजी कांदा उत्पादकांच... समस्या सोडवण्यासाठी कांदा धोरण समिती स्थापन केली. बाजारपेठ, साठवणूक, निर्यात, उत्पादन खर्च आणि पुरवठा साखळी यांचा अभ्यास करून ४५ दिवसांत अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली होती. त्यासाठी चार उपसमित्याही स्थापन करण्यात आल्या. मात्र वर्ष उलटून गेले तरी या समितीचा अहवाल सरकारकडे सादर झालेला नाही. त्यानंतर पुन्हा १३ मार्च २०२६ रोजी सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. दोन बैठका झाल्या; परंतु त्यातूनही कोणतीही ठोस उपाययोजना समोर आली नाही. ही बाब राज्य सरकारच्या नियोजनशून्यतेचे आणि गंभीरतेच्या अभावाचे प्रतीक म्हणावी लागेल.

वास्तविक पाहता कांद्याच्या प्रश्नाचे मूळ केवळ राज्यात नाही, तर केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये आहे. कांदा निर्यातबंदी, किमान निर्यातमूल्य, निर्यात शुल्क आणि बफर स्टॉक खरेदी हे चार निर्णय थेट केंद्र सरकारच्या अखत्यारित येतात. बाजारात भाव वाढले की ग्राहकहिताच्या नावाखाली निर्यातबंदी लादली जाते. निर्यात शुल्क वाढवले जाते किंवा किमान निर्यातमूल्याची अट घातली जाते. परिणामी जागतिक बाजारपेठेत भारतीय कांद्याची स्पर्धात्मकता कमी होते आणि देशांतर्गत बाजारात कांद्याची आवक वाढल्याने भाव कोसळतात. त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो.

गेल्या काही वर्षांतील घटनाक्रम पाहिला तर ही बाब अधिक स्पष्ट होते. डिसेंबर २०२३ ते मे २०२४ या कालावधीत केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी लागू केली. त्याच काळात केंद्र सरकारच्या एनसीईएल या कंपनीने कांदा निर्यात करून सुमारे २०० कोटी रुपयांचा नफा कमावला. त्यानंतर निर्यात शुल्क आकारून आणखी १,४०० कोटी रुपये केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा झाले. म्हणजे सरकारने महसूल कमावला; पण कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ... कोणताही लाभ मिळाला नाही. ... बाजारभाव कोसळल्यामुळे लाखो शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

यंदाच्या हंगामातही अशीच परिस्थिती निर्माण झाली. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना कांद्याला मिळालेला दर अनेक ठिकाणी उत्पादन खर्चापेक्षाही कमी राहिला. बियाणे, खत, मजुरी, वाहतूक, साठवणूक आणि वीज खर्च वाढला आहे. मात्र बाजारभावातील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांना योग्य परतावा मिळत नाही. शेतकरी कांदा साठवून ठेवतो; पण नंतर दर वाढतील याची शाश्वती नसते. उलट साठवणुकीतील नुकसान आणि अतिरिक्त खर्च यामुळे त्याची अडचण वाढते.

कांदा प्रश्नावर अभ्यासकांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. सर्वप्रथम कांद्याच्या निर्यातीबाबत स्थिर आणि दीर्घकालीन धोरण असणे आवश्यक आहे. ग्राहक आणि शेतकरी यांच्यात समतोल राखणे गरजेचे असले तरी वारंवार होणारे धोरणात्मक बदल टाळले पाहिजेत. निर्यातबंदी हा शेवटचा पर्याय असला पाहिजे. त्याऐवजी बफर स्टॉकचे योग्य व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध आयात-निर्यात यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे साठवणूक क्षमता वाढविणे. महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या कांद्याच्या तुलनेत आधुनिक साठवणूक सुविधा अपुऱ्या आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि खासगी क्षेत्राच्या सहभागातून मोठ्या प्रमाणात शीतगृह व आधुनिक कांदा चाळी उभारण्याची गरज आहे. यासाठी अनुदान आणि स्वस्त कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तिसरी बाब म्हणजे बाजार व्यवस्थेचे आधुनिकीकरण. ई-नाम आणि इलेक्ट्रॉनिक कांदा बाजार यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना देशभरातील बाजारभावांची माहिती मिळेल आणि त्यांना अधिक स्पर्धात्मक दर मिळण्याची शक्यता वाढेल. तसेच कांदा प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास अतिरिक्त उत्पादनाचा उपयोग करता येईल.

कांद्याला किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्याची मागणीही सातत्याने होत आहे. जरी त्याची अंमलबजावणी तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असली, तरी उत्पादन खर्चावर आधारित संरक्षणात्मक किंमत यंत्रणा विकसित करण्याची गरज आहे. बाजारभाव कोसळल्यास थेट शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाई देण्याची व्यवस्था देखील विचारात घेता येईल.

राज्य सरकारच्या समित्या आणि बैठका यापलीकडे आता प्रत्यक्ष कृतीची वेळ आली आहे. अहवालांच्या फाइल्स आणि घोषणांच्या पलीकडे जाऊन शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेणे आवश्यक आहे. कांदा हा केवळ एक कृषी माल नाही; तो महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार आहे. त्यामुळे कांद्याबाबतचे धोरण हे राजकारणापेक्षा अर्थकारण आणि शेतकरी हित या निकषांवर ठरले पाहिजे. कांद्याचे भाव वाढले की ग्राहक आणि भाव घसरले की शेतकरी, या दोन्ही टोकांवर राजकारण केले जाते. मात्र कायमची फरफट होते ती उत्पादकाची. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी परस्पर समन्वय साधून स्थिर, पारदर्शक आणि शेतकरीहिताचे कांदा धोरण तातडीने जाहीर करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा समित्यांचे गुऱ्हाळ सुरू राहील आणि कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा आश्वासनांच्या जंजाळात अडकलेला दिसेल.

## चाऱ्यांची दुरुस्ती करतांना अतिक्रमणधारकांमध्ये संभ्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** महाराष्ट्र जलसिंचन सुधारणा योजनेअंर्तगत गोदावरी उजवा तटकालव्याच्या वितरण व्यवस्थेच्या नूतनीकरणाच्या कामाची तीन दिवसा पूर्वी सुरुवात झालेली आहे. गोदावरी उजव्या कालव्याच्या चारीचे दुरुस्ती खोलीकरण मजबूतीकरणाचे टेल भागापासून युध्दपातळीवर काम सुरु आहे. जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे हे काम सुरु असून त्यासाठी अंदाजे १५० कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नोव्हेंबर२०२५मध्ये वाकडी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ह्या कामांचे भूमीपूजन करण्यात आले होते चाऱ्यांची कामे करतांना अतिक्रमणे काढण्याचे निर्देश त्यांनी दिले होते त्यानुसार पाटबंधारे खात्याच्या चितळी येथील सिंचन शाखेच्या अधिकाऱ्यांनी सबंधित अतिक्रमणधारकांना २१ मे रोजी अंतिम नोटीस बजावलेली आहे मात्र नोटीस मध्ये चाऱ्यांची नेमकी सिमारेषा किती आहेत. याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे अतिक्रमणधारकामध्ये संभ्रमाचे वातावरण आहे चाऱ्यांच्या दुरुस्तीमुळे शेतकऱ्यांसह सर्वांचा फायदा होणार असल्यामुळे चारीच्या कामासाठी सर्वांचीच सहकार्याची भूमिका असल्याचे दिसून येत आहे.

## संजीवनी अकॅडमीला चार राज्यातून प्री-सुब्रतो फुटबॉल स्पर्धेत उपविजेते पद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** संजीवनी अकॅडमीच्या १७ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल संघाने साऊथ झोन (सेकंड) सीबीएसई प्री-सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा २०२६ मध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कठोर परिश्रम, शिस्तबद्ध खेळ, जिद्द आणि उत्तम सांघिक समन्वयाच्या जोरावर उपविजेतेपद पटकावले. दक्षिण विभागातील केरळ, महाराष्ट्र , गोवा व कर्नाटक या राज्यांतील बलाढ्य संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अशा प्रकारे संजीवनी अकॅडमीने क्रीडा क्षेत्रातही आघाडी कायम ठेवली आहे.



संजीवनी अकॅडमीच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी फुटबॉल उपविजेत्या संघाचा व संघातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा सत्कार केला.

स्पर्धेच्या साखळी फेरीत संजीवनी संघाने सेंट्रल रेल्वे स्कूल, कल्याणचा २-० असा पराभव करून विजयी सुरुवात केली. उपांत्यपूर्व फेरीत समता इंटरनॅशनल स्कूलचा ३-० असा दणदणीत पराभव करून संजीवनीने उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. उपांत्य सामन्यात केरळच्या डॉन बॉस्को स्कूलविरुद्ध अत्यंत चुरशीचा सामना रंगला. नियोजित वेळेत सामना १-१ असा बरोबरीत राहिल्यानंतर निकालासाठी पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. या थरारक संघर्षात संजीवनी अकॅडमीने ४-३ असा विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात पुण्याच्या आर्मी पब्लिक स्कूलशी संजीवनीचा मुकाबला झाला. संपूर्ण सामन्यात खेळाडूंनी जिद्दीने संघर्ष केला आणि रौप्य पदकावर आपले नाव कोरले. या स्पर्धा समता इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडल्या.

आर्यन गौतम सोनवणे, ईशान इम्रान सय्यद (गोलरक्षक), विहान रोहित वाघ (कर्णधार), सात्विक सुभाष औताडे, नैतिक सरोज, गगनराजे सतीश जाधव, निर्भय रुपेश पारख, आरुष संदीप शिंदे, प्रत्यूष दीपक जाधव, विश्वजित राजेंद्र मांजरे, श्रेयस लक्ष्मण भड आणि शौर्य वैभव घुले या खेळाडूंनी शानदार खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, व्यवस्थापकीय संचालिका डॉ. मनाली कोल्हे, डिरेक्टर ऑफ ऑडिट सुंदरी सुब्रमण्यम, प्राचार्या अनुश्रीता सिंह यांनी खेळाडू, क्रीडा विभाग प्रमुख विरुपक्ष रेड्डी, फुटबॉल प्रशिक्षक मोती कुमार यांचे अभिनंदन केले.

## म्हैसगावात बोकड चोरी ; पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव**,राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे बोकडे चोरी होत असल्याने पशुपालक व शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच गावातील सोमनाथ लिबाजी मुसळे यांच्या घरासमोर बांधलेला एक बोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून गाव व परिसरात रात्रीच्या वेळी बोकडे चोरीच्या घटना घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. विशेषतः रात्री उशिरा किंवा पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरटे गोठे व शेत परिसरातील जनावरांवर लक्ष ठेवून चोरी करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

बोकड पालन हा अनेक शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असून चोरीच्या घटनांमुळे पशुपालकांना आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी गोठ्यांची व शेत परिसराची अधिक काळजी घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. दरम्यान, गावकऱ्यांनी प्रशासनाने या घटनांची गंभीर दखल घेऊन रात्रीची पोलिस गस्त वाढवावी, चोरी करणाऱ्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सैन्य दल, पोलीस व अग्निवीरमध्ये निवड झालेल्या युवकांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील मक्तापुर येथील सुपुत्र ऋषिकेश नंदु कराडे या तरुणाची भारतीय सैन्य दलात तर सचिन सूर्यभान गारुळे याची अग्निवीर,दिघी गावचे सुपुत्र अजित भाऊसाहेब भक्त या तरुणाची धाराशीव जिल्हा पोलीस दलात निवड झाली याबद्दल मक्तापुर येथे झालेल्या गौरव सोहळयात सर्वांचा सन्मान करण्यात आला.



वरील तरुणांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केल्याबद्दल परिसरामधून या युवकावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.या तरुणांना शारीरिक व बौद्धिक क्षमता निर्माण करण्यासाठी समर्पण करिअर अकॅडमी नेवासा फाटाचे संचालक प्रा.विकास शेलार व संस्थापक प्रा.दादासाहेब जायभाये यांचे विशेष सहकार्य लाभले.

या तरुणांचा अत्यंत जल्लोषामध्ये व वाजत गाजत नेवासा फाटा परिसरामध्ये जंगी स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मुकिंदपूरचे लोकनियुक्त सरपंच सतीशदादा निपुंगे,पोलीस पाटील आदेश साठे,मेजर ऋषिकेश कराडे यांचे वडील नंदु कराडे,मराठा सूकाणु समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे,गणेश कराडे,सुनिल कोळेकर, यांच्यासह मक्तापूर व मुकिंदपुर परिसरातील नागरिक या युवकांच्या स्वागतासाठी उपस्थित होते.

## संजीवनी हा केवळ संस्थांचा समूह नव्हे, तर एक मोठा परिवार : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : संजीवनी हा केवळ संस्थांचा समूह नसून एक मोठा परिवार आहे. संजीवनीचे माजी विद्यार्थी आज जगभर विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून, हीच संजीवनी शैक्षणिक संकुलाची खरी आणि यशस्वी ओळख असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित आमदार विवेक कोल्हे यांनी केले. संजीवनी युनिव्हर्सिटी व संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित विविध संस्थांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे, संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू यांच्यासह विविध संस्थांचे संचालक, प्राचार्य, डीन, रजिस्ट्रार, पदाधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात अमित कोल्हे यांनी विधान परिषदेवर गुणवत्तेच्या बळावर झालेली विवेक कोल्हे यांची निवड संपूर्ण संजीवनी परिवारासाठी अभिमानास्पद असल्याचे सांगितले. संजीवनीचे




संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी युवकांना कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्याच विचारधारेतून विवेक कोल्हे यांची वाटचाल सुरू असून, ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी त्यांनी विधान परिषदेतून प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना आमदार विवेक कोल्हे म्हणाले, मला मिळालेले यश हे केवळ माझे वैयक्तिक यश नसून संजीवनी परिवारातील प्रत्येक सदस्याचे यश आहे. शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य संजीवनीने सातत्याने केले आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांची तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचविण्याची भूमिका होती. त्याच ध्येयाने संजीवनी शिक्षण संस्थेने कार्य केले आहे. ते पुढे म्हणाले की, संजीवनी ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी आणि त्यांच्यातील क्षमता विकसित करणारी संस्था आहे. जगभर विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी हे संस्थेच्या गुणवत्तेचे आणि संस्कारांचे जिवंत उदाहरण आहेत. यामध्ये शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, एखादा अभियंता चुकला तर त्याच्या कामावर परिणाम होतो, डॉक्टर चुकला तर रुग्ण बरा होऊ शकत नाही; मात्र शिक्षक चुकला तर संपूर्ण पिढीचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शिक्षकांचे कार्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आणि संजीवनीचे शिक्षक ही जबाबदारी समर्थपणे पार पाडत आहेत. विधान परिषदेवरील आमदार म्हणून कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असल्याचे सांगत राज्यातील शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी सभागृहात प्रभावीपणे भूमिका मांडण्याची ग्वाही त्यांनी दिली. अध्यक्षीय समारोपात नितीन कोल्हे यांनी विवेक कोल्हे यांची विधान परिषद सदस्यपदी झालेली निवड ही विकास, शिक्षण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या नेतृत्वाचा गौरव असल्याचे सांगितले. युवकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आमदार विवेक कोल्हे यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरु करा : आ. कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसह राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नाफेड आणि एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री Devenda Fadnavis यांच्याकडे पत्राद्वरे केली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात आमदार कोल्हे यांनी नमूद केले आहे की, कोपरगाव तालुक्यासह महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी मोठ्या प्रमाणात कांदा पिकाचे उत्पादन घेतात. मात्र सध्या कांद्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शेतीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्चात सातत्याने वाढ होत असताना कांद्याला मिळणारा कमी दर हा शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षाही कमी दराने कांदा विकावा लागत असल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. परिणामी शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असल्याचे कोल्हे यांनी निवेदनात म्हटले आहे.कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसह राज्यातील



सर्व बाजार समित्यांमध्ये नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू झाल्यास बाजारातील दरांना स्थैर्य मिळण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळून आर्थिक नुकसान टाळता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून संबंधित यंत्रणांना तातडीने आवश्यक निर्देश देण्यात यावेत व हमीभावाने कांदा खरेदी प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## एस. एस. जी. एम. महाविद्यालयाच्या विकास समितीच्या चेअरमनपदी ॲड. संदीप वर्पे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स (एस. एस. जी. एम.) महाविद्यालय, कोपरगावच्या विकास समितीच्या चेअरमपदी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. संदीप वर्पे यांची निवड करण्यात आली आहे.



ॲड. संदीप वर्पे यांच्या विकास समितीच्या चेअरमनपदी झालेल्या या निवडीबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे सदस्य आमदार विवेक कोल्हे, चैतालीताई काळे, सुनील गंगुले, महेंद्र काले, बाळासाहेब आव्हाड, ज्ञानेश्वर वाकचौरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी तसेच सर्व कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. याशिवाय माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. ॲड. वर्पे यांच्या अनुभव संपन्न नेतृत्वाचा लाभ महाविद्यालयाच्या शैक्षणिक, भौतिक व सर्वांगीण विकासासाठी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला असून त्यांच्या निवडीमुळे विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## साईबाबा सुपर हॉस्पिटलसमोरील हाइट बॅरिकेड तातडीने हटवावेत : रमेश गोंदकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शहरातील नगर-मनमाड मार्गावरील साईबाबा सुपर हॉस्पिटलसमोरील हाइट बॅरिकेड तातडीने हटवून वाहतुकीसाठी मार्ग खुला करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेश गोंदकर यांनी निवेदनाद्वरे केली आहे. शिर्डीतील दुहेरी हत्याकांडानंतर शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत मंदिर परिसराच्या सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजनांवर चर्चा झाली होती. त्यानुसार पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मंदिरालगतच्या नगर-मनमाड मार्गाच्या पूर्व बाजूस हाइट बॅरिकेड उभारण्याच्या सूचना दिल्या होत्या. अवजड वाहनांना मंदिर परिसरातून प्रवेश रोखणे आणि केवळ हलक्या वाहनांसाठी मार्ग खुला ठेवणे हा त्यामागील उद्देश होता.



मात्र प्रशासनाने पश्चिम बाजूलाही हाइट बॅरिकेड उभारल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाल्याचा आरोप गोंदकर यांनी केला आहे. शहराच्या पूर्वेकडील रिंग रोडचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने नगर व मनमाडकडून येणारी बहुतांश वाहने पश्चिमेकडील मार्गाचा वापर करतात. त्यामुळे अवजड वाहनांची वर्दळ लोकवस्तीत वाढून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

आरबीएल चौकातील हाइट बॅरिकेडला वाहनांची धडक बसून ते दोन ते तीन वेळा कोसळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगर-मनमाड रस्त्याचे काम आणि पूर्वेकडील रिंग रोड पूर्ण होईपर्यंत पश्चिम बाजूचे हाइट बॅरिकेड हटवून नगरकडून मनमाडकडे जाणारा मार्ग तातडीने खुला करावा, अशी मागणी गोंदकर यांनी केली आहे. याबाबत शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी त्वरित दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देताना बाबासाहेब कोते, निलेश कोते, दीपक गोंदकर, अलका गोतीस, अमित शेळके, निलेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिर्डीत आजपासून ८ वी राष्ट्रीय केटलबेल स्पोर्ट चॅम्पियनशिप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : श्री साईबाबांच्या पावन नगरी शिर्डी येथे ८ वी राष्ट्रीय केटलबेल स्पोर्ट चॅम्पियनशिप २०२६ ला गुरुवार (दि. ४) पासून प्रारंभ होत असून, ही स्पर्धा ७ जूनपर्यंत श्री साईबाबा शैक्षणिक संकुलात रंगणार आहे. देशातील विविध राज्यांतील सुमारे १७० खेळाडू या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेणार आहेत. केटलबेल स्पोर्ट इंडिया असोसिएशन, केटलबेल स्पोर्ट लिफ्टिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्या हस्ते होणार असून, विविध क्षेत्रांतील मान्यवर, क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आणि क्रीडाप्रेमी उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय स्पर्धेत सब-ज्युनिअर, ज्युनिअर, सिनिअर तसेच व्हेटरन गटातील खेळाडू सहभागी होत आहेत. कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, दिल्ली, उत्तराखंड, पंजाब, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र या राज्यांतील खेळाडू आपल्या ताकदीचे, कौशल्याचे आणि क्रीडाभावनेचे प्रदर्शन करणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणार असून, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासही मदत करणार आहे. श्री साईबाबा संस्थान ट्रस्टकडून शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही प्रोत्साहन दिले जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. या स्पर्धेमुळे देशभरातील खेळाडूंना शिर्डीच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाची ओळख होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून, सहभागी खेळाडू, प्रशिक्षक आणि मान्यवरांच्या स्वागतासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## तानसेन बिवाल यांची भीम आर्मीच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती



**राहुरी** : भीम आर्मीचे संस्थापक अध्यक्ष व खा. चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार तानसेन बिवाल यांची भीम आर्मीच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे येथे आयोजित भीम आर्मी महाराष्ट्र कमिटीच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. बैठकीला महाराष्ट्र प्रमुख अशोक कांबळे, राज्य मुख्य सचिव दीपक भालेराव तसेच सुनील थोरात, सुनील गायकवाड, संदीप शेलार, गुड्डू सोलंकी आणि लाल्ला सय्यद यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बिवाल यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. तानसेन बिवाल यांनी यापूर्वी अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्य करताना सामाजिक अन्याय व अत्याचाराविरोधात विविध आंदोलने उभारून पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर राज्य उपाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

## खंडाळ्यात शुकवारी ढोक महाराज यांचे किर्तनसेवा

**खंडाळा** : श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे सद् गुरु योगीराज गंगागिरी महाराज व सद् गुरु ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच, महंत रामगिरी महाराज व विदर्भरत्न रामराव महाराज ढोक यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण या सोहळ्यामध्ये शुक्रवारी (दि. ५ ) जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.रामराव महाराज ढोक (नागपूरकर )यांचे किर्तनसेवा होणार आहेत.तसेच दुसऱ्यादिवशी शनिवारी (दि.६) जुन रोजी महंत रामगिरी महाराज ( गोदावरी धाम )यांचे सकाळी ११ वाजता काल्याचे किर्तन होणार आहे.कीर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे.येथील या हनुमान मंदिराच्या प्रांगणात सप्ताह कालावधीत ह.भ.प. गोविंद महाराज मलिक यांच्या सुश्राव्य वाणीतून नर्मदास्कंद महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहाचे व्यासपीठ चालक ह.भ.प.आप्पासाहेब महाराज गुंजाळ आहेत. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी किर्तन सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले.

## गणोरे येथे जिल्हा बँकेचे नवीन एटीएम सुरू



**गणोरे** : जिल्हा सहकारी बँक आता शाखांना नवीन एटीएमची सुविधा देत नाही परंतु सिताराम पाटील गायकर व मुख्य कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे यांच्या प्रयत्नाने जिल्हा बँकेने एक खास बाब म्हणुन गणोरे शाखेस एटीएमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे जिल्हा बँक ,व विका सोसायट्यांनी शेतकऱ्यांना मोठे सहकार्य केले आहे. शेतकऱ्यांच्या विकासामध्ये जिल्हा बँक व विविध कार्य सोसायट्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. नव्वद टक्के शेतकऱ्यांच्या घरावरील पाचट काढण्याचे काम जिल्हा बँकेने केले असल्याचा मत अकोले शाखेचे विकास अधिकारी भारत वाकचौरे यांनी केले. गणोरे ( अकोले ) येथील जिल्हा सहकारी बँकेच्या गणोरे शाखेतील नवीन एटीएम चे उद्धाटन कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी तालुका देखरेख संघाचे कार्यकारी अधिकारी अंबादास दातीर, सोसायटीचे मा. चेअरमन अशोक आहेर,अनिल आंबरे, टि डी ओ. भरत वाकचौरे, शाखाधिकारी संजय वाकचौरे,प्रवीण शेळके, तुषार पोखरकर, प्रज्ञा पारधी, धनश्री आवारी, नरेंद्र आरोटे,सरपंच संतोष आंबरे, बाळासाहेब शिंदे यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जोर्वेत ४११ नागरिकांचा सामूहिक वाढदिवस उत्साहात साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : जोर्वे येथील लक्ष्मीआई मंदिर परिसरात गावातील ४११ महिला व नागरिकांचा सामूहिक वाढदिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवस असलेल्या नागरिकांना फेटे बांधून, केक कापून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या अनोख्या उपक्रमाचे कौतुक करताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी जोर्वे संस्कृतीचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव होत असल्याचे सांगितले.



यावेळी इंद्रजीत थोरात, शरद थोरात, के. के. थोरात, डॉ. जयश्री थोरात यांच्यासह विविध मान्यवर, ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, प्रवरा खोऱ्यातील जोर्वे संस्कृतीचा उल्लेख जागतिक स्तरावर केला जातो. दिल्लीतील संग्रहालयांमध्येही जोर्वे संस्कृतीची माहिती उपलब्ध आहे. या गावाला समृद्ध ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली असून प्रत्येकाने त्याचा अभिमान बाळगला पाहिजे.ते पुढे म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्वातंत्र्य चळवळीनंतर सहकार क्षेत्रात मोठे कार्य उभे केले.

त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेताना गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले आहेत. गावातील विविध मंदिरांच्या उभारणीपासून विकासकामांपर्यंत कोणताही भेदभाव न करता काम केले आहे. नागरिकांनी आपली समृद्ध परंपरा जपत पुढील पिढीला चांगले संस्कार द्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. सामूहिक वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना सामाजिक ऐक्य वाढविणारी आणि प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. जयश्री थोरात, शरद थोरात, के. के. थोरात, माणिकराव यादव यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंद्रजीत थोरात यांनी केले. रामदास काकड यांनी सूत्रसंचालन तर हर्षल काकड यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांना साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : पुरोगामी विचारांचे पाईक, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक तथा नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांना राष्ट्रसेवा दलाच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार ४ जून रोजी पुणे येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. एम.एस. सर्जन असलेल्या डॉ. तांबे यांनी वैद्यकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, सहकारी व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. संगमनेर नगराध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी नगरपालिकेला विकासाची दिशा दिली. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांचा वारसा आणि लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी समाजकारणात भरीव योगदान दिले. जयहिंद युवा मंचच्या माध्यमातून युवकांना संघटित करून पुरोगामी व विज्ञाननिष्ठ विचारांचा प्रसार केला. तसेच मतिमंद व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी संग्राम मतिमंद विद्यालयाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य उभे केले. नाशिक पदवीधर मतदारसंघातून सलग तीन वेळा विक्रमी मताधिक्याने निवडून येत त्यांनी विधान परिषदेत शिक्षण, कृषी, सहकार, डॉक्टर, वकील आणि बेरोजगार पदवीधरांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, आ. सत्यजित तांबे, ड. माधव कानवडे, बाबासाहेब ओहोळ, रणजीत सिंह देशमुख, दुर्गाताई तांबे, डॉ जयश्रीताई थोरात, इंद्रजीत थोरात, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, बाजीराव खेमनर, संपत डोंगरे, हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, राजेंद्र कडलग, राजेंद्र गुंजाळ, विश्वास मुर्तडक, डॉ. मैथिलीताई तांबे, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, दिलीप पुंड, नूर मोहम्मद शेख, प्रा.हिरालाल पगडाल, सुरेश झावरे यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# समनापूर प्राणघातक हल्ल्यातील दोघा आरोपीना बेड्या

## एकास पुण्यातून, तर दुसऱ्याला संगमनेर येथून

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : समनापूर बायपास चौफुली येथे महिनाभरापूर्वी झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणातील फरार दोघा मुख्य आरोपींना संगमनेर शहर पोलिसांनी अटक केली.यातील मुख्य आरोपी अरबाज जहागिरदार यास पुण्यातून, तर जुनेद शेख याला संगमनेर येथील त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे बायपास चौफुली परिसरात दोन गटांत किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले होते.

या घटनेत फिर्यादीवर चाकूने सात वार करण्यात आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संगमनेर शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०९ अन्वये गुन्हा दाखल केला. गंभीर घटनेनंतर जुनेद शेख व अरबाज जहागिरदार हे दोघेही फरार झाले होते.पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नियुक्त केले होते. तपासादरम्यान अरबाज जहागिरदार हा पुण्यातील सराडी परिसरात 'पेइंग गेस्ट' म्हणून राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.त्यानुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने मध्यरात्री सापळा रचून त्या अटक करण्यात आली. अरबाजला संगमनेर येथे आणल्यानंतर पोलिसांनी जुनेद शेख यालाही त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.दोन्ही आरोपींची वैद्यकीय तपासणी करून त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्यात आले असून, न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. सदरची कारवाई अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर, पोलीस उपनिरीक्षक सचिन वाकडे तसेच पोलीस शिपाई साईनाथ पवार व शशिकांत दाभाडे यांच्या पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.मुख्य आरोपींना अटक झाल्याने नागरिकांनी संगमनेर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समितीच्यावतीने तहसीलवर मोर्चाचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुका अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण कृती समितीच्या वतीने अनुसूचित जाती आरक्षण उप वर्गीकरणाच्या विरोधात मंगळवार दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता राहुरी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नुकत्याच आयोजित पत्रकार परिषदेत दिली. अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणामुळे समाजातील विविध घटकांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याचा दावा करत या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीच्या वतीने करण्यात आले. तसेच शासनाने अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# खंडाळा घरगणनेत तालुक्यात अव्वल

## पर्यवेक्षक एकनाथ रहाटे यांचा प्रशासकीय सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : जनगणना प्रक्रियेतील घरगणनेचे काम वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करत खंडाळा कार्यक्षेत्राने श्रीरामपूर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय कामगिरीचे नेतृत्व करणारे पर्यवेक्षक एकनाथ दत्तराव रहाटे यांचा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. खंडाळा कार्यक्षेत्रात नियुक्त करण्यात आलेल्या सहाही प्रगणकांच्या समन्वयातून रहाटे यांनी घरगणनेचे काम नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण केले. त्यामुळे तालुक्यातील सर्व क्षेत्रांमध्ये खंडाळा विभागाने आघाडी घेत प्रशासनाचा गौरव वाढविला आहे. या मोहिमेत प्रगणक रुपाली राऊत, ज्ञानदेव मोरे, तेजस्वी मुखेकर, रामभाऊ जाधव, रुपाली पवार आणि सीमा ढवळे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे घरगणनेचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण होऊ शकले.

या यशस्वी कामगिरीची दखल घेत प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या सूचनेनुसार नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहायक महसूल अधिकारी निलेश इंगळे, ज्येष्ठ शिक्षक नेते विजय काटकर तसेच ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांच्या हस्ते एकनाथ रहाटे यांचा शासकीय सत्कार करण्यात आला. सध्या तालुक्यात घरगणनेचे काम अंतिम टप्प्यात असताना खंडाळा संघाने मिळविलेल्या या यशामुळे प्रशासकीय वर्तुळात रहाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सहकाऱ्यांच्या बळावरच यश

प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहायक महसूल अधिकारी निलेश इंगळे तसेच सहकारी ट्रेनर्स यांचे मार्गदर्शन आणि प्रगणकांचे शंभर टक्के सहकार्य यामुळेच ही कामगिरी शक्य झाली. भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करण्याचा प्रयत्न राहील.

**एकनाथ रहाटे, पर्यवेक्षक, खंडाळा**

# वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना करा : नगरसेवक मापारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरात दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसानंतर अनेक भागांतील वीजपुरवठा वारंवार खंडित झाला. काही ठिकाणी तब्बल १२ तासांहून अधिक काळ वीज उपलब्ध नव्हती. पहिल्याच पावसात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आगामी पावसाळ्यात नागरिकांना अधिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी महावितरणने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी केली आहे. यासंदर्भात महावितरणचे सहाय्यक अभियंता वैभव कानडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात मापारी यांनी म्हटले आहे की, शहरातील अनेक घरांमध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध आजारांनी त्रस्त रुग्ण राहतात. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित झाल्यास त्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. सर्वांकडे इन्व्हर्टरची सुविधा नसून असली तरी त्याचा बॅकअप मर्यादित असतो. याशिवाय रात्रीच्या वेळी वीज नसल्यास चोरीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरातील रोहित्रे (डीपी), वीजतारा तसेच तारांजवळील झाडांची नियमित देखभाल करावी आणि आवश्यक त्या ठिकाणी नवीन रोहित्रे बसवावीत, अशी मागणी त्यांनी केली. यामुळे नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

# अनिल शेंगाळे यांचे पोलीस हवालदारपदी पदोन्नती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात गेली १६ वर्षे कर्तव्यनिष्ठ व उल्लेखनीय सेवा बजावणारे पोलीस नाईक अनिल शेंगाळे यांना पोलीस हवालदार पदावर पदोन्नती मिळाली आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत देण्यात आलेल्या या पदोन्नतीमुळे पोलीस दलासह सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मूळचे पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नळवणे येथील रहिवासी असलेले आणि सध्या राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे वास्तव्यास असलेले अनिल शेंगाळे यांनी बी.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे.



पोलीस सेवेत दाखल झाल्यानंतर त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि कार्यतत्परतेच्या बळावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. शेंगाळे यांनी आपल्या १६ वर्षांच्या सेवाकाळात तब्बल १३ वर्षे गोपनीय विभागात कार्य करत महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. गुन्हेगारी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना अचूक माहिती पुरविण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

अकोले, आश्वी आणि श्रीरामपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात त्यांनी उल्लेखनीय सेवा बजावली असून सध्या ते अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर येथे कार्यरत आहेत. या पदोन्नतीबद्दल अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त धोंडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच पोलीस हवालदार रविंद्र चव्हाण, रामेश्वर ढोकणे, सचिन धनाड, रामेश्वर वेताळ, काका मोरे, संदीप दरंदले, किशोर हिंगे, संभाजी वरे आदींनी शुभेच्छा दिल्या.

# मुळा कारखान्यावर शेकडो कोटींच्या कर्जाचा डोंगर

## सभासद, शेतकरी व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी निवडणूक होणार : प्रभाकर शिंदे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : गेल्या पंधरा वर्षांपासून मुळा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक बिनविरोध होत असल्याने सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचा आवाज दाबला गेला. यंदाच्या निवडणुकीत हा दबलेला आवाज बुलंदपणे ऐकू येणार असून केवळ सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन घालण्यासाठी नव्हे, तर कारखान्याच्या भवितव्यासाठी आम्ही उमेदवार उभे करणार आहोत, असे प्रतिपादन शिवसेनेचे नेते तथा पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख प्रभाकरराव शिंदे यांनी केले.

मुळा सहकारी साखर कारखाना व लोकनेते मारुतरावजी घुले पाटील ज्ञानेश्वर कारखान्यांच्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आयोजित पत्रकार परिषदेत शिंदे यांनी मुळा कारखान्याच्या सन २०२४-२५ च्या वार्षिक अहवालाचा आधार घेत व्यवस्थापनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. साखर संघाच्या कार्यालयातून प्राप्त झालेल्या



वार्षिक अहवालाचा सखोल अभ्यास केल्यानंतर ही पत्रकार परिषद घेत असल्याचे सांगताना शिंदे म्हणाले की, लेखापरीक्षकांनी (ऑडिटर) नोंदविलेल्या निरीक्षणांमधून कारखान्याची आर्थिक स्थिती आणि प्रशासकीय कारभार अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट होते.

कारखान्याचे भागभांडवल अवघे १४ कोटी रुपये असताना नियमानुसार दहापट कर्ज घेण्याची मर्यादा असतानाही कोणत्याही सक्षम यंत्रणेची आवश्यक परवानगी न घेता तब्बल ३७२ कोटी रुपयांचे कर्ज उचलण्यात आल्याचे अहवालातून दिसून येते. याशिवाय विविध संस्थांची देणीही प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार कारखान्याने एनएसडीसीकडून १७९ कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे.

तसेच कारखाना परिसरातील यश मल्टीस्टेटकडूनही ६४ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले असून त्यावरील जवळपास ५ कोटी रुपयांचे व्याज थकित असल्याचा दावा त्यांनी केला. शिंदे यांनी सभासदांच्या ठेवींवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. स्वखुशीच्या ठेवी असे आकर्षक नाव देत कारखान्याने सभासदांकडून तब्बल १४४ कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या आहेत. मात्र या ठेवींना आवश्यक मंजुरी नसल्याचा उल्लेख ऑडिट अहवालात असून अनेक सभासदांना ठेवींचे पासबुकही देण्यात आलेले नाही, असा आरोप त्यांनी केला.

कारखान्याची आर्थिक स्थिती इतकी बिकट असताना कर्मचाऱ्यांचे तब्बल सहा महिन्यांचे वेतन थकीत आहे. दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बिलांची देयकेही प्रलंबित असल्याचे सांगत त्यांनी व्यवस्थापनावर टीका केली. कारखान्याच्या मालमत्तेच्या मूल्यांकनावरही शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केले. अहवालात सुमारे ३१७ कोटी रुपयांची जमीन आणि ३०५ कोटी रुपयांची कारखान्याची इतर मालमत्ता दाखविण्यात आली असली तरी या मालमत्तेवर ९०० कोटी रुपयांहून अधिक कर्जाचा बोजा असल्याचे दिसून येते. त्यामुळे कारखान्याच्या आर्थिक आरोग्याबाबत गंभीर शंका निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. ऊस तोडणी व्यवस्थेवरही त्यांनी आक्षेप घेतला. ऑडिट अहवालात ऊस वजन काट्यांची नियमित फेअर-चेक चाचणी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा व कार्यपद्धती नसल्याचे ऑडिट रिपोर्ट मध्ये नमूद करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. कारखान्यातील सभासदांचे अडचणीवर बोलताना शिंदे म्हणाले की, कारखान्याचे एकूण १७ हजार ३९३ सभासद आहेत.

मात्र त्यापैकी केवळ २ हजार ५६८ सभासदांनीच कारखान्याला ऊस पुरविला आहे. उर्वरित सभासद कारखान्याने त्रास दिल्यामुळे इतर कारखान्यांकडे वळल्याचे चित्र दिसत असून हे विद्यमान व्यवस्थापनावरील अविश्वासाचे द्योतक आहे. स्वतःच्या सभासदांचा ऊस टिकवता येत नसेल तर ही बाब चिंतन करण्यासारखी आहे, असा टोला त्यांनी लगावला. ही निवडणूक केवळ विरोधासाठी विरोध करण्यासाठी नाही.

सभासदांना त्यांची व्यथा मांडण्यासाठी, कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि कारखान्याच्या आर्थिक कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी ही लढाई आहे. बाहेरील भागातून ऊस आणून कारखाना चालवायचा असेल तर मग मतदानाचाही अधिकार बाहेरील शेतकऱ्यांनाच द्यावा का? सभासदांना मतदान का मागता असा उपरोधिक सवाल करत शिंदे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. यंदाच्या निवडणुकीत प्रथमच सभासदांचा खरा आवाज ऐकू येईल आणि कारखान्याच्या भवितव्याचा निर्णायक कौल दिला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठात 'फुले समर्थ' कांदा बियाणे विक्रीला प्रारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बियाणे विक्री केंद्रात 'फुले समर्थ' या कांदा वाणाच्या बियाण्यांची विक्री मंगळवारी (दि. ३ जून) सुरू करण्यात आली. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते करजगाव (ता. नेवासा) येथील सुनिता फुलसौंदर व बेलापूर येथील शेतकरी मारुतराव राशिनकर यांना बियाणे देऊन विक्रीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी कुलगुरू डॉ. खर्चे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना 'फुले समर्थ' वाणाला आकर्षक लाल रंगामुळे बाजारात चांगला भाव मिळत असल्याचे सांगितले. तसेच कांदा लागवडीसाठी सुपीक व मध्यम ते भारी जमिनीची निवड, पेरणीपूर्वी बियाण्यांवर बिजप्रक्रिया तसेच खरीप व रांगडा कांद्याच्या लागवडीचे शिफारसीय कालावधी याबाबत मार्गदर्शन केले.

कांदा लागवडीसंदर्भातील तांत्रिक माहिती क्यूआर कोडद्वारे बियाण्यांच्या पिशव्यांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी यंदा निफाड, पिंपळगाव बसवंत, मालेगाव, पुणे, हाळगाव, धुळे व चास येथील केंद्रांवरही बियाणे उपलब्ध करण्यात आले आहे.

पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. ऑनलाइन व ऑफलाइन विक्री व्यवस्था, महिलांसाठी स्वतंत्र काऊंटर, पिण्याचे पाणी, मंडप व प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून बियाणे शिल्लक असेपर्यंत विक्री सुरू राहणार असल्याची माहिती प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र काशीद यांनी दिली.

## पान १ वरुन

### कृषी विद्यापीठातील कंत्राटी कामगाराचा खून

भीषण हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळशीराम गीते, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे व दारकुंडे यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. तसेच प्राथमिक तपासाला सुरुवात करण्यात आली. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

### महागाईविरोधातील आंदोलन आक्रमक

व्यक्त केला. अटक होण्यापूर्वी माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. महागाईमुळे सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. गॅस, पेट्रोल, डिझेलसह जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. जनतेचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो असून लोकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणे ही आमची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले. महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसने छेडलेल्या या आंदोलनामुळे नवी मुंबईत राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी काळात या प्रश्नांवरून संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### दिल्लीत अग्नितांडव

असल्याची माहिती समोर आली आहे. अनेक जण उपचारासाठी दिल्लीत आले होते आणि या परिसरातील निवासस्थानी राहत होते. त्यामुळे या आगीत अनेक कुटुंबांचे आधारस्तंभ कायमचे हरपले आहेत.

आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. मात्र, धुराच्या काळ्या लोटांमध्ये मदतीसाठी झगडणारे हात, खिडक्यांतून जीवाच्या आकांताने उड्या मारणारे नागरिक आणि आपल्या प्रियजनांचा शोध घेत रडणारे नातेवाईक हे दृश्य दिल्लीकरांच्या मनावर कायमची जखम करून गेले आहे.

## श्रीक्षेत्र पुणतांबा येथील ऐतिहासिक होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी निधी द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** विधानसभा मतदारसंघातील दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथील गोदावरी नदीवरील ऐतिहासिक होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदनाद्वरे केली आहे.

माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील श्रीक्षेत्र पुणतांबा हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. शिर्डीपासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर वसलेले हे गाव गोदावरी नदी येथे उत्तरवाहिनी होत असल्याने विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. वैदिक काळापासून ऋषी-मुनींनी येथे तपश्चर्या केली असून पुण्यप्राप्ती व मोक्षप्राप्तीसाठी काशीनंतर पुणतांब्याला विशेष महत्त्व असल्याची श्रद्धा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी गोदावरी नदीकाठी सन १७६५ ते १७९५ या कालावधीत भव्य होळकर घाट उभारला तसेच परिसरातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. गावातील अहिल्यादेवींनी बांधलेला वाडा आजही अस्तित्वात असला तरी तो जीर्ण अवस्थेत



आहे. गोदावरी तटावरील धार्मिक परंपरा आणि भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता होळकर घाटाचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित होते. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, पुणतांबा हे प्रख्यात संगीतकार सी. रामचंद्र (रामचंद्र नरहर चितळकर) यांचे जन्मगाव आहे. साईबाबांच्या आरत्या व भजनांचा समावेश असलेली पहिली ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध करण्याबरोबरच भारतरत्न लता मंगेशकर यांना ''ए मेरे वतन के लोगो'' या अजरामर गीतासाठी संधी देण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यामुळे पुणतांबा हे धार्मिकतेबरोबरच सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचेही केंद्र आहे. गोदावरी तटावर होळकर घाटासह ब्राह्मण घाट आणि विठ्ठल घाट असे तीन प्रमुख घाट आहेत. परिसरात विविध देवदेवतांची मंदिरे असून धार्मिक विधी, अस्थी विसर्जन आणि इतर संस्कारांसाठी राज्यभरातून भाविक येथे मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी होळकर घाटाची पुनर्बांधणी करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे श्रीक्षेत्र पुणतांबा येथील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी विशेष निधी उपलब्ध करून संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

## बेलापूर बायपासवरील स्पीडब्रेकर्सच्या कामाला अखेर मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर, :** श्रीरामपूर-राहुरी फॅक्टरी मार्गावरील बेलापूर बायपास येथे वारंवार होणारे अपघात लक्षात घेऊन स्पीडब्रेकर्स उभारण्याच्या प्रस्तावाला जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने अखेर मंजुरी दिली आहे. येत्या आठ ते दहा दिवसांत प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार असल्याची माहिती जिल्हा टॅक्सी असोसिएशनचे अध्यक्ष सुनील मुथा यांनी दिली. बेलापूर बायपास परिसर अपघातप्रवण असल्याने येथे तातडीने स्पीडब्रेकर्स उभारावेत, अशी मागणी टॅक्सी असोसिएशनने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती. या मागणीची दखल न घेतल्यास रस्तारोको आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. यासंदर्भात बेलापूर ग्रामपंचायत, बेलापूर पोलीस ठाणे तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयानेही संबंधित ठिकाणी स्पीडब्रेकर्स आवश्यक असल्याचे मत नोंदविले होते.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडे मंजुरीसाठी पाठविला होता. समितीने या प्रस्तावास हिरवा कंदील दिल्यानंतर कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. श्रीरामपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता बापूसाहे ब वराळे यांनी येत्या आठ ते दहा दिवसांत स्पीडब्रेकर्सचे काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे मुथा यांनी सांगितले.

दरम्यान, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे काम मंजूर झाल्याबद्दल सुनील मुथा यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी तसेच उपअभियंता बापूसाहेब वराळे यांचे आभार मानले आहेत. स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून अपघातांवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## 'साहेबराव वाबळे पुन्हा संचालक म्हणून यावेत'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव साहेबराव वाबळे हे ३१ मे २०२६ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला भावपूर्ण निरोप समारंभ आज (दि. ३ जून) बाजार समितीच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सभागृहात मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. यावेळी बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, माजी संचालक किशोर कालंगडे यांच्यासह व्यापारी, हमाल, मापाडी, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या सचिवपदाच्या कार्यकाळात साहेबराव वाबळे यांनी बाजार समितीत मोठ्या प्रमाणात विकासकामे राबवून समितीचा नावलौकिक जिल्ह्यासह राज्यभर वाढविला. कर्मचारी, हमाल, मापाडी, व्यापारी आणि शेतकरी यांच्यात समन्वय साधत त्यांनी पारदर्शक, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध कारभार केला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे बाजार समितीने विकासाच्या अनेक टप्प्यांवर यशस्वी वाटचाल केली. समारंभात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत साहेबराव वाबळे यांनी पुन्हा एक्सटेन्शनवर सचिव म्हणून बाजार समितीत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांनी आपल्या भाषणात, ''साहेबराव वाबळे हे सचिव पदावरून जरी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांनी पुन्हा राजकारणात सक्रिय होऊन बाजार समितीवर संचालक म्हणून यावे आणि आपल्या अनुभवाचा लाभ संस्थेला द्यावा,'' अशी अपेक्षा व्यक्त केली.निरोप समारंभादरम्यान वातावरण अत्यंत भावूक झाले होते. बाजार समितीच्या इतिहासात प्रथमच एका सचिवाच्या निरोप समारंभात हमाल, मापाडी, व्यापारी आणि कर्मचारी यांच्या अश्रूंचा बांध फुटल्याचे चित्र पाहायला मिळाले. आपल्या सहकाऱ्यांचे प्रेम आणि जिव्हाळा पाहून साहेबराव वाबळे यांनाही अश्रू अनावर झाले. बाजार समितीच्या इतिहासातील सर्वात मोठा आणि संस्मरणीय निरोप समारंभ म्हणून या कार्यक्रमाची नोंद झाली असून, उपस्थितांनी साहेबराव वाबळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## निधन वार्ता

### गफुर पठाण



**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील रहिवासी गफुर अब्दुल पठाण (वय ७५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात ३ मुले, ३ मुली आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते रसुल पठाण, आयमद पठाण आणि गणी पठाण यांचे वडील, तर पत्रकार समीर शेख यांचे आजोबा होते.

### भाऊसाहेब गमे



**पुणतांबा :** परिसरातील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब बन्सी गमे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, तीन मुली, दोन बहिणी असा परिवार आहे. गणेश कारखान्याचे शेतकी अधिकारी शिवाजी गमे तसेच व्यावसायिक संभाजी गमे यांचे ते चुलत बंधू तर विशाल यांचे वडील होत.

### दत्तात्रेय देसाई



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील खैरी निमगाव येथील दत्तात्रेय सदाशिव देसाई (वय ६० वर्ष ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले तीन मुली दोन बंधू एक बहिणी दोन असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते राम, लक्ष्मण, भरत देसाई यांचे ते वडील तर श्रीरामपूर येथील महसूल विभागातील सुनील देसाई यांचे ते बन्धु होत.

### शशिकांत पादीर



**शिरसगाव :** इंदिरानगर येथील माजी तहसीलदार . गुलाबराव पादीर श्रीरामपूर यांचे चिरंजीव शशिकांत पादीर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पाठीमागे आई, वडील,पत्नी, दोन भाऊ दोन मुली दोन भावजया आणि पुतणे असा परिवार आहे.

## नामस्मरण आणि चिंतनाशिवाय मानवी जीवाचा उद्धार नाही : अरुणनाथगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** माणसाचे प्रारब्ध कर्म सहज बदलत नाही. ते बदलण्याची ताकद केवळ भगवंतामध्ये आहे. भगवंताचे नामस्मरण आणि चिंतन केल्याशिवाय मानवी जीवाचा उद्धार होऊ शकत नाही, असा मोलाचा उपदेश श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान, भामाठाण येथील महंत स्वामी अरुणनाथ गिरी महाराज यांनी माळवाडगाव येथे आयोजित प्रवचनात भाविकांना केला. प्रवचनात बोलताना स्वामी महाराज म्हणाले की, ईश्वरी सत्तेशिवाय वृक्षाचे पानही हलत नाही. माणसे चितेला घाबरतात; मात्र साधुसंत आणि महात्मे मृत्यूला घाबरत नाहीत. प्रत्येकाने आपल्या जीवनात नामस्मरणाचे झाड लावावे. त्या झाडाला भक्तीचे अमृत फुलते. घरात बसूनही भगवंताचे नामस्मरण व भक्ती करता येते. कर्म आणि प्रारब्ध कोणालाही चुकविता आलेले नाही व यापुढेही चुकविता येणार नाही. संसार करताना सावध राहावे आणि परमार्थ करताना कधीही दुर्लक्ष करू नये. नामस्मरण आणि चिंतनामुळेच मानवी जीवनाला खरे सार्थक प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी अविनाश आसने यांच्या हस्ते स्वामी अरुणनाथ गिरी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले. या कार्यक्रमास अशोक बँकेचे व्हाईस चेअरमन बाबासाहेब आदिक, संचालक अॅड. उमेश लटमाळे, बाजार समितीचे माजी संचालक गिरीधर आसने, डॉ. नितीन आसने, सोपानराव आसने, जालिंदर आसने, शिवाजी वने, रावसाहेब टेकाळे, बाबासाहेब काळे, लक्ष्मीमाता दूध संघाचे संचालक सुरेश चिडे, भाजप तालुका उपाध्यक्ष डॉ. शंकरराव मुठे, भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक व पत्रकार संदीप आसने, लखन महाराज, गणपतराव आसने व मोठ्या संख्येने भाविक व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे आभार पत्रकार भाऊसाहेब काळे यांनी मानले.

## महावितरणाच्या ढिसाळ कारभार नागरिकांनी अधिकाऱ्यांना देशी दारू दिली भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर :** महावितरणच्या अधिकाऱ्यारी व कर्मचाऱ्यांचा कामात वारंवार निष्काळजीपणा करत तसेच दारू पिऊन बेजबाबदारपणे कामे करतात अशा अधिकारी व कर्मचाऱ्यां विरोधात कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांना देशी दारू भेट देण्यात येऊन आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे. महावितरणचे उपकार्यकारी अभियंता काळे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, की महावितरणचे कर्मचारी हे कामावर असताना सतत दारूच्या नशेत असतात शहरात कुठेही विद्दूत पुरवठा खंडित नागरिकांचे फोन उचलत नाही. व थातूर मातुर उत्तर देऊन वेळ मारून नेतात. नुकत्याच गंगापूर शहरात सायंकाळी जोरदार वादळी वारा व पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी झाडांच्या फांदया तुटून विद्युत पोल वरील तारा तुटून शहरासह लगतच्या शेत वस्तीवर अनेक ठिकाणी पुरवठा खंडित झाल्या मुळे शेतकऱ्यांनी व नागरिकांनी महावितरण च्या कर्मचाऱ्यांना फोन केला असता काही कर्मचारी हे दारूच्या नशेत असल्याने त्यांनी अनेक नागरिकांचे फोन उचलले नाही व नंतर फोन स्विच ऑफ करून टाकले यावरून महवितरणच्या कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा व आपल्या कर्तव्याच्याबाबतीत उदासीनता दिसून आली आहे. विद्युत वितरण कंपनी विषयी शहरात नागरिकांमध्ये नाराजी पसरली असून शहरात सध्या अनेक ठिकाणी झाडांच्या फांदया विद्युत तारेवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी अडथळा होत असलेल्या सर्व झाडांच्या फांदया त्वरित तोडण्यात याव्या. व तालुक्यातील सोलार सर्वेसाठी काही लाईनमन हे पैसे उकळत असून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवण्यात यावी. शहरातील बत्तीसे, पठाण,डोके, पटेल, स्वामी, तुळशीबाग यासह इतर सर्व ट्रांसफार्मर वरील केबलचे व दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करुन कामचुकार व दारुड्या कर्मचाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात यावी.दारुड्या कर्मचाऱ्यांचा प्रतीकात्मक निषेध म्हणून देशी दारूची बाटली भेट देण्यात येत असून कामचुकार कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास व गंगापूर शहर व तालुक्यातील वितरणचा कारभार सुरळीत न झाल्यास शहरातील नागरिकांच्या वतीने आपल्या कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला. निवेदनावर गंगापूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष अमोल जगताप, नगरसेवक अख्तर सय्यद, राहुल वानखेडे, नगरसेवक नवनाथ कानडे, गुलाम शहा, हनिफ बागवान आदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बीएसएनएल सेवा असून नसून खोळंबा ग्राहक हैराण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** सध्या श्रीरामपूर शहरात व ग्रामीण भागात स्वस्त व उत्कृष्ट सेवा देणारी बीएसएनएलची दूरध्वनी सेवा सतत ग्राहकांच्या असंतोषाला सामोरी जात आहे. कारण आधी जमिनी खालून जाणाऱ्या केबलमधून सेवा मिळत होती वादळ वारा पाऊस याचा अडथळा नसायचा . आता तर चांगली सेवा देण्यासाठी फायबर केबल अनेक खांबावरून दूरपर्यंत ग्राहकापर्यंत जात असल्याने अनेक वेळा केबल तुटीचे प्रकार घडत आहेत. कधी महावीतरणचे कर्मचारी झाडे तोंडताना केबलच तोडून टाकतात त्यामुळे ही अत्यावश्यक सेवा खंडित होते. दूरध्वनी तसेच इंटरनेट सेवा,बँकिंग सेवा,विद्यार्थ्यांचा ऑनलाइन अभ्यास आदि समस्यावर परिणाम होत आहे. दिनांक २ मे रोजी परिसरातील अनेक ग्राहकांची दिवसभर इंटरनेट,दूरध्वनी सेवा ठप्प झाली होती चौकशी केली तर काम चालू आहे लवकर होईल असे सांगितले जाते परंतु दूसरा दिवस उजाडला तरी सेवा खंडीतच होती याकडे वरिष्ठ अधिकारी कधी लक्ष देणार ?त्यातच सतत विजेचा लपंडाव सुरू असतो वीज आली तर दूरध्वनी सेवा बंद,दूरध्वनी सेवा सुरू झाली की वीज पुरवठा बंद .. बीएसएनएलची सेवा कधी सुरळीत होऊन सुविधा मिळणार याची चिंता ग्राहकान पडते. या आधी मोबाइल आल्याने लँडलाईन सेवा बंद केली . फोन बंद केले तरी विकासाची भाषा केली जाते पण त्याऐवजी गैरसोय होत असते. कॉलनीत घरासमोर दुसऱ्या कंपनीचे खांब उभे आहे त्यातून अखंडित सेवा सुरू राहणाऱ्या कंपनीची सेवा घ्यावी काय असा प्रश्न ग्राहकाना पडला आहे. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे

## टिळकनगर येथे मारामाऱ्या परस्परविरोधी गुन्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरालगतच्या असलेल्या टिळकनगर येथील दोन कुटूंबात किरकोळ कारणावरून हाणामाऱ्याचा प्रकार घडला. याप्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले. पहिली फिर्याद विक्रम प्रमोद खंडागळे यांनी दिली असून त्यात म्हटले आहे की, आपण रूग्णालयाच्या बाहेर बसलेलो असताना त्या ठिकाणी आरोपी आले व सकाळी माने पुतण्याबरोबर झालेला वाद मिटवून घेवू असे म्हणाले, मिटवायचे नसल्यास तुम्हाला सगळ्यांना मारील, अशी धमकी देवून शिवीगाळ करत, मारहाण करत जवळ पडलेला दगड डोक्यात मारल्याचे फिर्यादीत म्हटले असून सदर फिर्यादीवरून सुमीत सुनील जाधव, आदित्य संदीप साळवे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी फिर्याद देवा किरण साळवे यांनी दिली असून त्यात म्हटले आहे की, आपण मित्रासोबत चहा पिऊन रांजणखोल चारीच्या कडेला गप्पा मारत असताना पाठीमागच्या गल्लीत राहणारे आरोपी तेथे आले व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच एकाने लोखंडी कत्ती काढून मारण्याचा प्रयत्न केला असे फिर्यादीत म्हटले आहे. सदर फिर्यादीवरून शरद खंडागळे, सनी खंडागळे, विक्रम खंडागळे, अजय खंडागळे, राहुल खंडागळे, बन्सी खंडागळे, घनशाम खंडागळे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## माहेरी राहून पोटगी मागणाऱ्या पत्नीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पतीचा त्याग करून माहेरी राहत असताना पोटगीची मागणी करणाऱ्या महिलेचा अर्ज नेवासा येथील न्यायालयाने खर्चासह फेटाळून लावला आहे. मौजे भेंडा (ता. नेवासा) येथील वर्षा कैलास ढवण यांनी भारतीय सैन्य दलात अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या पतीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत अन्न, वस्त्र व निवाऱ्यासाठी पोटगी मिळावी, यासाठी नेवासा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यापूर्वी संबंधित महिलेने पतीने आपल्याला नांदण्यास घेऊन जावे, या मागणीसाठी हिंदू विवाह अधिनियमाच्या कलम ९ अंतर्गत दावा दाखल केला होता. मात्र हा दावा तसेच त्यावरील अपीलही न्यायालयाने फेटाळले होते. दरम्यान, पतीने पत्नीने स्वेच्छेने त्याग केल्याचा व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून मानसिक छळ केल्याचा आरोप करत दाखल केलेल्या घटस्फोटाच्या अर्जाला न्यायालयाने मंजुरी दिली होती. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करून पत्नीने कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण नसताना पतीपासून वेगळे राहत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोटगीसाठी आवश्यक बाबी सिद्ध करण्यात अर्जदार अपयशी ठरल्याने तिला पोटगीचा अधिकार नसल्याचा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविला. या प्रकरणात पतीच्या बाजूने वरिष्ठ विधिज्ञ अॅड. अजितसिंग पी. परदेशी यांनी काम पाहिले. त्यांना अॅड. आरती पाळंदे यांनी सहकार्य केले.

## जेजुरी खंडोबा मंदिर गड परिसराची धर्मदाय आयुक्तांकडून पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा मंदिराला नऊ महिन्यानंतर नवे पुणे विभागाचे सहधर्मदाय आयुक्त दिनेश कोठलींकर यांनी भेट देत दर्शन घेतले आणि गड परिसरातील विविध विकासकामांची तसेच स्थानिक प्रश्नांची पाहणी केली. जेजुरी पंचक्रोशीत नुकत्याच झालेल्या विश्वस्त समिती संदर्भातील तक्रारी आणि त्यानंतर झालेल्या ग्रामस्थ, नगरपालिका व ट्रस्ट समितीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर धर्मदाय आयुक्तांनी ही भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रामस्थ, विश्वस्त आणि स्थानिक प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने काम करून मंदिर परिसराचा विकास साधावा, अशा सूचना विश्वस्त समितीला दिल्या. बुधवारी सकाळी साडेअकरा वाजता त्यांचे जेजुरी गडावर आगमन झाले. त्यांनी दुपारच्या महापूजेचा लाभ घेत खंडोबाचे दर्शन घेतले. तसेच इतिहासप्रसिद्ध ४२ किलो वजनाचा 'महाखंडा' हातात घेऊन दर्शन घेतले. सध्या ही ऐतिहासिक तलवार पत्र्याच्या पेटीत ठेवण्यात आली असून, गेल्या अनेक वर्षांपासून ती प्रेक्षणीय स्वरूपात सुशोभित मेघडंबरीत ठेवून तिची माहिती विविध भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याची स्थानिकांची मागणी आहे. याबाबत चर्चा करताना धर्मदाय आयुक्तांनी तलवारीसाठी योग्य प्रेक्षणीय व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले. यानंतर गुरव, पुजारी, वीर कोळी व गडशी समाजाच्या वतीने धर्मदाय आयुक्तांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री मार्तंड देव संस्थान तर्फे विश्वस्त प्रमुख अॅड. विश्वास पानसे, अॅड. पांडुरंग थोरवे, माजी विश्वस्त प्रमुख मंगेश घोणे, पोपट खोमणे आणि राजेंद्र खेडेकर यांनी खंडोबाची पगडी व घोंगडी देऊन त्यांचा सन्मान केला. भेटीदरम्यान धर्मदाय आयुक्तांनी गुरव, पुजारी, वीर कोळी व गडशी समाजाच्या विविध समस्या जाणून घेतल्या. तसेच भाविकांसाठी पार्किंग सुविधा उभारण्याच्या दृष्टीने संत ज्ञानेश्वर पालखी मैदान परिसराची पाहणी केली. जेजुरी गडावर लवकरच प्रदूषणमुक्त ई-व्हेईकल (एत) सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव असून, या सेवेमध्ये रामोशी समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी रामोशी समाजाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन धर्मदाय आयुक्तांना देण्यात आले. जेजुरी परिसरातील भंडारा विक्री व्यवस्थेबाबतही माहिती घेण्यात आली. यावर विश्वस्त समितीशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल, असे धर्मदाय आयुक्तांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. दरम्यान, आपत्कालीन मार्गाचा गैरवापर होत असल्याच्या स्थानिकांच्या तक्रारींबाबत बोलताना धर्मदाय आयुक्तांनी स्पष्ट केले की, यापुढे केवळ गरजू व अत्यावश्यक व्यक्तींनाच या मार्गाचा वापर करता येईल. त्याबाबत आवश्यक सूचना विश्वस्त समितीला देण्यात आल्या आहेत. यावेळी जेजुरी शहरातील विविध मान्यवर, ग्रामस्थ, विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि . ३ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १९० २८० २२६ | ०-६ | १२३ ४४८ ८८० | जोड ०१-५६-२४-७३-६९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १८० २८९ २२५ | ९-३ | १२० १३९ ३३७ | जोड ९०-४३-८६-१२-३५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-४ | १३० २४८ ४४६ | जोड ५६-९४-२३-०८-४७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | 2 1 | 8 5 | 8 2 | 1 3 | 1 |
| To | 3 16 | 4 6 56 | 8 7 05 | 8443 | 4309 | 3 |
| 13/03/2026 | 6 | 0 8 | 0 8 | 9 8 | 8 4 | 5 |
| 16/03/2026 | 4 | 8 2 | 3 4 | 4 1 | 1 6 | 3 |
| to | 556 | 9 0 21 | 8 6 02 | 9202 | 37 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | 9 0 | 0 0 | 9 7 | 8 0 | 8 |
| 23/03/2026 | 6 | 3 4 | 1 5 | 7 1 | 2 3 | 1 |
| to | 834 | 5 5 46 | 7 6 03 | 8346 | 4364 | 6 |
| 27/03/2026 | 9 | 6 5 | 8 9 | 8 0 | 0 0 | 7 |
| 30/03/2026 | 2 | 1 1 | 1 2 | 1 1 | 1 1 | 2 |
| to | 890 | 3 3 87 | 6 7 97 | 1112 | 56 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | 6 4 | 0 0 | 9 9 | 6 9 | 9 |
| 06/04/2026 | 1 | 2 1 | 7 1 | 4 3 | 1 1 | 4 |
| to | 370 | 2 4 02 | 7 3 98 | 7582 | 5278 | 6 |
| 10/04/2026 | 3 | 6 5 | 8 5 | 7 0 | 6 4 | 8 |
| 13/04/2026 | 5 | 1 1 | 6 2 | 5 1 | 8 2 | 1 |
| to | 606 | 5 4 43 | 7 3 45 | 03 77 | 9685 | 4 |
| 17/04/2026 | 9 | 0 9 | 0 9 | 0 3 | 0 0 | 0 |
| 20/04/2026 | 5 | 1 8 | 4 1 | 3 5 | 3 3 | 3 |
| to | 7 00 | 2 8 58 | 5 2 53 | 5571 | 8468 | 7 |
| 24/04/2026 | 8 | 7 9 | 9 2 | 5 7 | 0 9 | 8 |
| 27/04/2026 | 3 | 1 4 | 7 1 | 1 6 | 1 6 | 2 |
| to | 563 | 2 4 85 | 8 6 71 | 2729 | 98 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | 0 0 | 0 0 | 8 9 | 9 8 | 0 |
| 04/05/2026 | 1 | 3 1 | 6 2 | 2 2 | 2 2 | 2 |
| to | 771 | 9 4 34 | 8 3 48 | 7425 | 54 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | 9 8 | 0 9 | 9 6 | 8 0 | 9 |
| 11/05/2026 | 5 | 2 3 | 2 6 | 2 1 | 1 4 | 1 |
| to | 679 | 7 7 04 | 3 0 68 | 3901 | 2785 | 5 |
| 15/05/2026 | 6 | 0 0 | 9 0 | 3 0 | 8 7 | 9 |
| 18/05/2026 | 8 | 4 5 | 1 1 | 1 7 | 4 2 | 2 |
| to | 979 | 5 6 96 | 7 4 22 | 2830 | 8893 | 5 |
| 22/05/2026 | 0 | 0 8 | 8 7 | 9 8 | 8 9 | 6 |
| 25/05/2026 | 5 | 2 3 | 1 8 | 4 1 | 2 4 | 5 |
| to | 6 11 | 9 4 37 | 3 9 78 | 69 05 | 5606 | 5 |
| 29/05/2026 | 0 | 0 6 | 3 0 | 8 0 | 8 0 | 6 |
| 01/06/2026 | | | | | | |
| to | | | | | | |
| 05/06/2026 | | | | | | |

# नालेगाव परिसरातील अनधिकृत शेड जमीनदोस्त!

## अवैध व्यवसायावर महापालिकेचा बडगा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील अवैध व्यवसाय आणि अतिक्रमण करणाऱ्यांवर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने पोलीस प्रशासनाच्या मदतीने नालेगाव ते नेप्ती नाका चौक, अमरधाम भिंतीलगतचा परिसर आणि गाडगीळ पटांगणातील भाजीबाजार परिसरात विशेष मोहीम राबवली. या कारवाईत अमरधाम परिसरात भिंतीलगत असलेल्या एका अवैध धंद्याचे शेड या पथकाने जमीनदोस्त केले. या कारवाईमुळे अनेक दिवसांपासून सार्वजनिक जागांवर ठाण मांडून बसलेल्या अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

महानगरपालिकेच्या वतीने शहरात सुरक्षित आणि स्वच्छ परिसर निर्माण करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून आज सकाळपासून या भागात कारवाई सुरू करण्यात आली. रस्त्याच्या कडेला आणि सार्वजनिक जागेत अनधिकृतपणे उभारण्यात आलेली पत्र्याची व इतर शेड जेसीबी मशीनच्या साहाय्याने पूर्णपणे तोडून टाकण्यात आली. तसेच या ठिकाणी सुरू असलेल्या अवैध व्यवसायांचे साहित्य प्रशासनाने जप्त केले आहे.

ही धडक कारवाई महानगरपालिकेचा अतिक्रमण विभाग, प्रभाग समिती क्रमांक दोन आणि कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे केली. कारवाई दरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी कोतवाली पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अत्यंत नियोजनबद्ध रीतीने ही मोहीम राबवून संपूर्ण परिसर मोकळा केला. सार्वजनिक जागा बळकावणाऱ्यांवर आणि शहरात अवैध धंदे करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक कारवाई सातत्याने सुरू राहील, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे. या धडक मोहिमेमुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.




## जुने कोर्ट परिसरात मध्यरात्री एकाच मालकाच्या दोन कार पेटविल्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर अज्ञात समाजकंटकांनी एकाच मालकाच्या वेगवेगळ्या ठिकाणी पार्क केलेल्या दोन कार पेटवून दिल्याची धक्कादायक घटना ३ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास शहरातील कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. या आगीत दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले असून, या प्रकरणी कार मालक गौरव विनायक कुलकर्णी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार ३ जून रोजी मध्यरात्री २:३० च्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी गौरव विनायक कुलकर्णी (वय ३३, रा. शनी चौक, गुजर गल्ली, अहिल्यानगर) हे त्यांच्या कुटुंबासह घरी झोपलेले असताना त्यांचे काका राजाभाऊ कुलकर्णी यांना घराबाहेर काहीतरी जळाल्याचा वास आला. त्यांनी खिडकीतून खाली पाहिले असता घराजवळ खाली उभ्या केलेल्या त्यांच्या होंडा एक्स्टर (क्र. एमएच १६, डीएस ३३२३) या कारतून धूर निघत असल्याचे दिसून आले. गौरव कुलकर्णी व त्यांच्या काकांनी तातडीने खाली येऊन पाण्याचा वापर करत आग विझवण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक तपासणीत गाडीचे बोनेट, मडगार्ड आणि आतील वायरिंग जळून खाक झाल्याचे निष्पन्न झाले.



ही आग विझवून घरात जात असताना गौरव कुलकर्णी यांना अग्निशमन दलाच्या गाडीचा आवाज ऐकू आला. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दुसऱ्या कारची चौकशी करण्यासाठी जुन्या कोर्टगल्लीकडे धाव घेतली. त्यांची दुसरी कार कौटुंबिक न्यायालय कमानीच्या शेजारी व निशा हॉस्पिटलसमोर उभी केलेली होती. कुलकर्णी तेथे पोहोचले असताना त्यांची दुसरी महिंद्रा एक्स युव्ही ५०० (क्र. एमएच १६, डीएस ५५५०) ही गाडी जळताना दिसून आली, कारला भीषण आग लागलेली होती व अग्निशमन दलाचे जवान ती आग विझवत होते. अग्निशमन विभागाने ही आग आटोक्यात आणली, परंतु तोपर्यंत या गाडीचेही सीट, बोनेट,

वायरिंग आणि काचा पूर्णपणे जळून नुकसान झाले होते. एकाच रात्री दोन गाड्यांना कोणी आणि का आग लावली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक निता अडसरे पुढील तपास करत आहेत.

## कौडगाव आठरे येथे घातक शस्त्रासह एक ताब्यात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** पाथर्डी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध हत्यारांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत तालुक्यातील कौडगाव आठरे येथे एका इसमाकडून तलवार व लोखंडी पाईपची चेन जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी आरोपी बाबासाहेब बर्डे (वय ५२ कौडगाव ता.पाथर्डी) या व्यक्तीविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जून रोजी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना कौडगाव आठरे येथील पाण्याच्या टाकीजवळ एक व्यक्ती हातात तलवार घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.



या माहितीच्या आधारे पोलिसांचे विशेष पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसरात छापा टाकून संशयित व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे विनापरवाना एक तलवार व लोखंडी पाईपपासून बनविलेली चैनकव्हर हत्यार आढळून आली. पोलिसांनी अवैधरित्या बाळगण्यात आलेली तलवार व चैन हत्यार जप्त करून संबंधित इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## वृद्ध दांपत्याला जावई, नातवाकडून मारहाण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील नालेगाव परिसरामध्ये कौटुंबिक पैशांच्या वादातून जावई आणि नातवाने वृद्ध दांपत्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून जावई व नातवाला पोलिसांनी कोयत्यासह ताब्यात घेतले आहे. या प्रकाराने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, नालेगाव येथील रहिवासी असलेल्या एका पंचावन्न वर्षीय वृद्ध महिलेने या संदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला आणि त्यांच्या पतीचा गेल्या दीड वर्षापासून त्यांच्या मुलीच्या कुटुंबासोबत पैशांवरून वाद सुरू आहे. याच वादातून दुपारी एकच्या सुमारास नातू सार्थक विजय रासकर याने तक्रारदार महिलेच्या घरी जाऊन मोठा आरडाओरडा केला आणि तेथून निघून गेला.

यानंतर दुपारी दोनच्या सुमारास नातू सार्थक आणि जावई विजय बबन रासकर हे दोघे पुन्हा फिर्यादीच्या घरात घुसले. तुम्ही आमची संपत्ती विकून खाल्ली, असा आरोप करत नातवाने वृद्ध आजीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. काही वेळातच वृद्ध पती घरी आले असता, आरोपींनी दोघांनाही अत्यंत घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर नातू सार्थक याने त्याच्या गाडीतून धारदार कोयता काढला आणि दोघांनाही संपवून टाकण्याची धमकी दिली.

## जयंती मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन डीजे मालकासह दोघांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील तोफखाना पोलीस स्टेशन अंतर्गत एका जयंती उत्सव मिरवणुकीत सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव मिरवणूक मार्गावर हा प्रकार घडला. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष आणि डीजे मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भिस्तबाग चौक येथील पार्वती कॉर्नर समोरून ही मिरवणूक जात होती. मिरवणुकीमध्ये आरोपींनी मोठ्या आकाराची डीजे सिस्टीम लावून अत्यंत कर्णकर्कश आवाजात गाणी वाजवली. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण निर्माण झाले. त्यांनी मोठ्या आवाजात गाणी सुरूच ठेवून आवेशपूर्ण घोषणाबाजी देखील केली. सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीक्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुजय विल्यम हिवाळे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष दादा बंडू नाबदे (रा. ताजनापूर, शेवगाव, सध्या रा. पारिजात चौक, सावडी) आणि डीजे मालक प्रवीण बबन भोंडवे (रा. ढवळपुरी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा व ध्वनी प्रदूषण नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## अकोळनेर येथे घरफोडी : कुलूप तोडून दागिने व रोकड लंपास

**अहिल्यानगर :** नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोळनेर येथे एका बंद घराचे कुलूप खोलून अज्ञात चोरट्याने ७१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात नवनाथ मारुती साळुके (वय ३७, रा. अकोळनेर, ता. जि. अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नवनाथ साळुके हे त्यांचे घर बंद करून गेले असता, अज्ञात चोरट्याने संधी साधून त्यांच्या घराचे कुलूप उघडले आणि आत प्रवेश केला. चोरट्याने घरातील ५० हजार रुपये किमतीचे एक तोळा वजनाचे सोन्याचे गंठण, १८ हजार रुपये किमतीची चार ग्रॅम वजनाची कानातील कर्णफुले आणि २ हजार रुपये किमतीची सोन्याची नथ असा एकूण ७० हजार रुपयांचा ऐवज चोरला. तसेच घरात ठेवलेली १ हजार रुपयांची रोकड, ज्यामध्ये ५०० रुपयांच्या दोन नोटा होत्या, ती देखील चोरट्याने लंपास केली.

हा सर्व प्रकार फिर्यादी यांच्या राहत्या घरी दिवसा ढवळ्या घडला. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख आणि पोलीस अंमलदार गांगुर्डे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गांगुर्डे करत आहेत. परिसरात दिवसा झालेल्या या घरफोडीमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.


### जाहीर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. उपविभाय अधिकारी साहेब, भाग श्रीरामपूर यांचे न्यालयातील

आरटीएस अपील अर्ज क्रमांक ७८/२०२६

नानासाहेब एकनाथ खांदे व इतर ४- अर्जदार विरुध्द

१. बाळासाहेब रामभाऊ मोरगे--- प्रतिवादी
२. सुमनबाई रामभाऊ मोरगे ---- प्रतिवादी
३. वच्छलाबाई बबन मुसमाडे-----प्रतिवादी
४. प्रमिला सुखदेव काळे ---- प्रतिवादी
५. हिराबाई नवनाथ खंडागळे ---- प्रतिवादी
६. मिना मिनीनाथ खडके ---प्रतिवादी

प्रति,

१. बाळासाहेब रामभाऊ मोरगे २. सुमनबाई रामभाऊ मोरगे रा. दिघी, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर ३. वच्छलाबाई बबन मुसमाडे रा. देवळालीप्रवरा, ता. राहुरी जि. अहिल्यानगर ४. प्रमिला सुखदेव काळे रा. नरसाळी, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर ५. हिराबाई नवनाथ खंडागळे रा. वांजुळ गुंजाळ, ता. राहुरी जि. अहिल्यानगर ६. मिना मिनीनाथ खडके रा. दिघी ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर ज्या अर्थी अर्जदार नानासाहेब एकनाथ खांदे व इतर ४ रा. देवळालीप्रवरा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी आपले विरुध्द या न्यायालयात, मंडळ अधिकारी बेलापुर बु. यांनी दि. ०८/०१/२०२६ रोजी मंजुर केलेला फेरफार क्र. २५०१ व दि. ०७/०२/२०२६ राजी मंजुर केलेला फेरफार क्र. २५१० विरुध्द आर टी एस अपील दाखल केलेले आहे. संदर अर्जात आपण प्रतिवादी म्हणुन सामील आहात, आपणास या न्यायालयामार्फत वारंवार नोटीस पाठवुन देखील नोटीस बजावणी होत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाचे कामकाज लांबणीवर पडत आहे.

त्याअर्थी आपणास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण नोटीस प्रसिध्द झाल्या पासून नेमलेल्या तारखेपुर्वी म्हणजे दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० व. उपविभागीय कार्यालय श्रीरामपूर येथे आपण स्वतः अगर आपले वकीलामार्फत हजर होवुन आपले म्हणणे दयावे. आपण हजर न राहील्यास प्रकरणाची एकतर्फे सुनावणी घेवून पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक ०३/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी दिली आहे.

शिक्का

उपविभागीय अधिकारी
श्रीरामपूर भाग श्रीरामपूर


## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीची उद्यापासून बैठक

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणी अहिल्यानगर येथे दि.५ ते ७ जून ला होत आहे त्यानिमित्ताने व्याख्यान,पुस्तक प्रकाशन,पुस्तक प्रदर्शन तसेच प्रबोधन फेरीचे आयोजन केल्याची माहिती महा अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी दिली आहे. अहिल्यानगर येथील श्री बडी साजन मंगल कार्यालयात दि.५ जून रोजी राज्य कार्यकारिणी सुरू होईल.सकाळी १० वाजता उद्घाटन होईल. दिवसभर संघटनात्मक कार्याचा आढावा व चर्चा होईल. सायंकाळी ६ वाजता ज्येष्ठ संपादक,माजी खासदार कुमार केतकर यांचे व्याख्यान होणार आहे.हा व्याख्यानाचा कार्यक्रम सर्वासाठी खुला आहे.मानसिक स्वास्थ्य,चार्वाक, उदंड झाले बुवा या तीन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात उत्कृष्ट काम केलेल्या कार्यकर्त्यांचा गौरव केला जाईल. रात्री ७.३० ते ८.३० वाजता शहरातील सर्व पुरोगामी,डाव्या चळवळीतील लोकांचा स्नेह मेळावा होणार आहे. दि.६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातून बुवाबाजी विरोधी संघर्ष प्रबोधन फेरीचे आयोजन केले आहे.सायंकाळी ६.३० वाजता अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे शतकवीर आणि लक्ष्यवेधी पुरस्काराने काही कार्यकर्त्यांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोमटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आहे.तिन्ही दिवस पुस्तक प्रदर्शन राहील. राज्यभरातून ३०० हून अधिक प्रमुख पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.या बैठकीचे नियोजन जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड,प्रधान सचिव विनायक सापा,अध्यक्ष बाबासाहेब बुधवंत,उपाध्यक्ष प्रमोद भारुळे आदी कार्यकर्ते करीत आहेत.

## शब्दगंध साहित्यिक संमेलनात ॲड. अनुराधा येवले यांना पुरस्कार



**अहिल्यानगर :** सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ड. अनुराधा येवले यांना १७ व्या दोन दिवसीय शब्दगंध साहित्यिक संमेलनात राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते झालेल्या या सन्मान सोहळ्यामुळे संमेलनाला विशेष प्रतिष्ठा लाभली. साहित्य, समाजकारण आणि संस्कृती यांचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. या प्रसंगी शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय योगेशजी सोमन, प्रमुख पाहुणे आयएएस अधिकारी गुलाबराव खरात, येरवडा कारागृहाचे अधीक्षक इन्स्पेक्टर रेवणजी कानडे, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे व सौ. बनसोडे, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष उद्योजक राजेंद्र उदागे, मंत्रिमामा पांडुळे, शर्मिला गोसावी, घोलप मॅडम, स्वाती ठुबे आणि सुनील गोसावी तसेच साहित्यिक, कवी, लेखक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ड. अनुराधा येवले यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात बोलताना स्वागत अध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले, समाजातील वंचित, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी आहे. ड. अनुराधा येवले यांनी सामाजिक बांधिलकी जपत केलेले कार्य प्रेरणादायी असून अशा व्यक्तींच्या कार्यातून समाजाला नवी दिशा मिळते. साहित्य आणि समाजकारण यांचा सेतू निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम शब्दगंध साहित्य परिषद करत आहे.

## राष्ट्रीय आइस हॉकीसाठी ऐम स्पोर्ट्सचे १२ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड




**अहिल्यानगर :** अहिल्यानगरच्या ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून, या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व बाळासाहेब खोमणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्राचे आणि अहिल्यानगरचे नाव उंचावावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. अकॅडमीचे प्रशिक्षक शुभम करपे आणि प्रमोद डोंगरे यांनीही खेळाडूंना शुभेच्छा देताना त्यांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून आइस हॉकी आणि आइस स्केटिंग या खेळांच्या प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## २४ तास वीज पुरवठा खंडित रहात असेल तर...

# बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचे का?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** काही क्षणांसाठी अवकाळी पाऊस, वादळ सुटलं. परंतु अवघ्या काही मिनिटांमध्ये संपूर्ण शहराची वीज यंत्रणा मृत होऊन पडली. शहराच्या अनेक भागांमध्ये बारा ते चौदा तास वीज नव्हती. कहर म्हणजे शहराचा आत्मा असणाऱ्या बाजारपेठेत तर तब्बल चोवीस तास वीज पुरवठा खंडित होता. त्यानंतरही विजेचा लपंडाव सतत सुरूच आहे. काही लोकांना बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचं आहे का, असा संतप्त सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

थोड्या वेळासाठी झालेल्या पावसाने संपूर्ण वीज पुरवठा यंत्रणात कोलमडून पडल्यानंतर ठाकरे शिवसेनेने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काळे म्हणाले, बाजारपेठेसह शहर अधोगतिकडे चालले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माळीवाडा बस स्टँड ते सर्जेपुरा हा बाजारपेठेचा मुख्य रस्ता गायब झाला आहे. मध्यवर्ती शहरातील काही रस्ते खोदून तीन-चार महिने लोटले तरी देखील अद्याप पर्यंत काम पुढे सरकायला तयार नाही. जाणून बुजून बाजारपेठेतील कामे रखडवली जात आहेत. प्रश्नांचा गुंता तयार केला जात आहे. प्रशासन नेमके करते तरी काय ? जाणीवपूर्वक बाजारपेठेला वेठीस धरण्याचा कुणाचा डाव आहे काय ? असं सवाल काळेंनी केला आहे.



**वीज, रस्त्याचा प्रश्न मार्गी लावा :**

विजेचा लपंडाव थांबला पाहिजे. पावसाळा सुरू होत आहे. दर शनिवारी बाजारपेठेसह शहरामध्ये महावितरण शट डाऊन घेत असते. या काळात मग नेमका कोणता मेंटेनन्स केला जातो ? मेन्टेनन्स होऊन देखील लाईट गेल्यावर ती तात्काळ पूर्वत का होत नाही ? हे थांबणार नसेल तर महावितरण प्रशासनाचे विरोधात ठाकरे शिवसेना तीव्र आंदोलन छडील असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे. काही भाजप पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्याचा धागा पकडत काळे म्हणाले, भाजपने हे त्यांच्या नेत्यांना, महायुतीच्या लोकप्रतिनिधींना सांगावे. जे लोक 'अर्थ'पूर्ण स्वार्थासाठी पडद्या अडून बाजारपेठेला वेठीस धरतात त्यांचेच कार्यकर्ते लोकांचा कळवळा असल्याचा खोटा आव आणतात, असा टोला काळेंनी लगावला आहे.

**बाजारपेठ उध्वस्त करण्याचं षडयंत्र**

शहराच्या उपनगरांमध्ये मोक्याच्या ठिकाणी राजकीय नेतृत्वाच्या भागीदारीतून मर्जीतल्या बिल्डरांचे काही प्रकल्प, मॉल नियम धाब्यावर बसवून उभे राहत आहेत. शहराची बाजारपेठ उध्वस्त झाल्या शिवाय त्यांच्या गाळ्यांना गिऱ्हाईक मिळणार नाहीत. म्हणून अनेक दशकांची परंपरा असणारी ऐतिहासिक मूळ बाजारपेठ उध्वस्त करण्याचा षडयंत्र काही राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने राबविल जात असल्याचा गंभीर आरोप किरण काळे यांनी केला आहे.

# पर्यावरण परिषदेचे आयोजन

## आत्मनिर्धार फौंडेशनचा पुढाकार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून आत्मनिर्धार फाउंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या पुढाकारातून अहिल्यानगर जिल्ह्यातील कापूरवाडी तलाव परिसरात 'वड'राईमध्ये 'पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवारी ( ता. ५ जून) सकाळी ७ वाजता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली. गतवर्षी ५ जून ला पहिली ग्रामीण पर्यावरण परिषद इसळक लिंगतीर्थ येथे घेण्यात आली होती. यंदाचे हे दुसरे वर्ष आहे.

या परिषदेचे उद्घाटन नुकतीच युपीएससीतून आय.आर. एस. अधिकारी म्हणून निवड झालेले ओंकार खुंटाळे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर भूषविणार आहेत. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे भूजल माहिती केंद्राचे समन्वयक भूवैज्ञानिक अजिंक्य काटकर आणि निसर्गप्रेमी महंत बाल ब्रम्हचारी श्री शिवदत्त महाराज, वृंदावन आश्रम, शहापूर उपस्थितांना मार्गदर्शन करतील.

या परिषदेतून अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पर्यावरणप्रेमी, संस्था, कार्यकर्ते आणि नागरिकांना एकत्र आणून एक सक्षम नागरी संघटना स्थापन करण्याचा मानस अरण्य फाउंडेशनचे अमित गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. तरी या परिषदेसाठी अधिकाधिक पर्यावरणप्रेमींनी एकत्र यावे, असे आवाहन पर्यावरण संवर्धन समितीचे समन्वयक ॲड. राहुल ठाणगे यांनी केले.

**पोपटराव खोसे यांना जीवनगौरव!**

जलसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी पोपटराव खोसे यांना आत्मनिर्धार फाउंडेशनचा 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येईल. सन्मानचिन्ह, शाल, छोटेसे रोपटे आणि ५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणाऱ्या एका व्यक्तीला प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली.

द•ख•ल

## निवडणूक निरीक्षक म्हणून अश्विन अशोक मुदगल यांची नियुक्ती

**पुणे, :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाकरिता अश्विन अशोक मुदगल यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक शाखेकडून कळविण्यात आली आहे. श्री. मुदगल यांच्या निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-१०४ असा असून त्यांचा संपर्क क्रमांक ९२२६३६३००२ आहे. नागरिकांना त्यांना सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत भेटता येईल. संपर्क अधिकारी सागर कोतकर (सं.क्र.९९२१७१५१५१) असा आहे. विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने काही तक्रारी असल्यास त्या अनुषंगाने संपर्क साधण्याचे आवाहन मतदान निरीक्षक यांनी केले आहे.

## काठापूर बुद्रूक येथील शेतकऱ्यांच्या विद्युत कृषी पंपाच्या केबलची चोरी

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील काठापुर बुद्रुक येथे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.घोड नदीवरील बंधाऱ्यालगत बसविण्यात आलेल्या तब्बल २५ विद्युत पंपांच्या केबल सोमवार दि. १ रोजी पहाटे चोरीला गेल्याने सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.ऐन उन्हाळ्यात पिकांना पाण्याची नितांत गरज असताना ही घटना घडल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

काठापुर बुद्रुक येथील घोड नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या मोठ्या बंधाऱ्यातून काठापुर बुद्रुक, लाखनगाव, पोंदेवाडी



आणि पारगाव परिसरातील शेतकरी सिंचनासाठी पाणी उपसा करतात. या ठिकाणी सुमारे ८५ विद्युत पंप कार्यरत असून मोटरच्या खोक्यापासून मोटरपर्यंतच्या केबल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. त्यामुळे २५ हून अधिक शेतकऱ्यांचे प्रत्येकी दहा ते पंधरा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सध्या कांदा आणि भाजीपाला पिकांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आधीच आर्थिक संकटात आहेत. त्यातच केबल चोरीमुळे सिंचन बंद पडण्याची वेळ आली असून उभी पिके जळून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे याच परिसरात यापूर्वीही पाच वेळा केबल चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे वारंवार होणाऱ्या चोरीमुळे शेतकरी संतप्त झाले असून पारगाव कारखाना पोलीस ठाण्याने तातडीने चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहा : आयुक्त सूर्यवंशी

**पुणे :** पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना २०२७'च्या घरसूचीकरण व घरगणना सर्वेक्षणासंदर्भात सोशल मीडियावर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्याने नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे. सोशल मीडियावर जनगणना प्रक्रियेबाबत विविध प्रकारची अप्रमाणित माहिती आणि खोटी संकेतस्थळे प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले. महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या माध्यमातूनच जनगणनेचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता मोबाईलवरील अधिकृत 'एचएलओ ॲप 'द्वारे ऑनलाइन स्वरूपात माहिती नोंदविली जात असल्याचे शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेच्या माहितीनुसार, 'जनगणना २०२७'च्या पहिल्या टप्प्यातील घरसूचीकरण व घरगणनेच्या प्रत्यक्ष कामास १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. एचएलओ ॲपच्या माध्यमातून घरांचे सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात येत असून, ही प्रक्रिया सुरक्षित, अचूक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचेही शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नमूद केले. प्रशासनाने नागरिकांना खोट्या संकेतस्थळांपासून आणि सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अचूक जनगणना ही शहर विकासाची भक्कम पायाभरणी असून, शाळा, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर नागरी सेवांचे नियोजन अचूक माहितीच्या आधारेच प्रभावीपणे करता येते, असे प्रशासनाने स्पष्ट केले. जनगणना अधिकारी केवळ आवश्यक माहिती नोंदवतात. ते कोणतेही आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा इतर सरकारी कागदपत्र, बँक तपशील अथवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती सुरक्षित आणि गोपनीय राखली जाते.

# पोलीस दलात बदल्यांचा धुरळा

### आज रंगणार 'बदली दरबार', ४० पोलिसांना पदोन्नती

**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस दलातील बहुप्रतिक्षित प्रशासकीय बदली प्रक्रियेला अखेर सुरुवात झाली असून, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुरुवारी (४ जून) पोलीस मुख्यालयात 'बदली दरबार' आयोजित केला आहे. या प्रक्रियेअंतर्गत जिल्ह्यातील ३०० पेक्षा जास्त पोलीस अंमलदारांच्या बदल्या केल्या जाणार आहेत.

एकाच पोलीस ठाण्यात किंवा शाखेत पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांकडून आधीच तीन पसंतीची ठिकाणे मागवण्यात आली होती. तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या काळात ही प्रक्रिया सुरू झाली होती, मात्र ३० एप्रिल रोजी त्यांच्या बदलीनंतर हा विषय रेंगाळला होता. नवीन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पदभार घेताच या प्रक्रियेला गती दिली आहे. बदलीपात्र सर्व अंमलदारांना गुरुवारी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्यांच्या पसंतीचा विचार करून या बदल्या केल्या जातील. या प्रक्रियेत पोलीस शिपाई, नाईक, हवालदार आणि सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

दरम्यान, पोलीस अधीक्षकांनी जिल्हा पोलीस दलातील ४० कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. यामध्ये २० पोलीस नाईक कर्मचाऱ्यांना पोलीस हवालदार पदावर, तर २० पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती देण्यात आली आहे. या पदोन्नतीमुळे पोलीस वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. तसेच, पुढील आठ दिवसांत जिल्ह्यातील पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांची प्रक्रियाही पार पडणार आहे. दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेले आणि वादग्रस्त ठरलेले पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी बदलले जाणार असल्याने अधिकारी वर्तुळात मोठी धावपळ सुरू झाली आहे.

# जुन्नरमध्ये रक्ताच्या नात्याला काळिमा मुलाने वडील व भावाची केली हत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यात रक्ताच्या नात्याला काळिमा फासणारी घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून मुलाने आपल्या वडील व लहान भावाची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे ओतूर पोलिसांनी आरोपी मुलाला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिलेल्या माहितीनुसार पारगाव मढ तर्फे हद्दीत बगाडवाडी येथे राहणाऱ्या जयराम महादू मुकणे वय ६० आणि राजेंद्र जयराम मुकणे वय २७ यांची त्यांच्याच मुलगा व भाऊ बाबाजी जयराम मुकणे वय ३३ याने दगडाने ठेचून हत्या केली.असा प्राथमिक अंदाज आहे. घटनेनंतर आरोपी फरार होण्याचा प्रयत्न करत होता, मात्र ओतूर पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली. प्राथमिक तपासात कौटुंबिक वादातून हा खून



झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून जमीन, पैसा, कौटुंबिक कलह यावरून वडील व मुलामध्ये वारंवार भांडणे होत होती, अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे. ओतूर पोलीस स्टेशन येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या घटने संपूर्ण जुन्नर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे

## चांडोली बुद्रुक येथे नारळाचे झाड पडून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू



**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यात मंगळवार दिनांक २ रोजी दुपारनंतर झालेल्या वादळी वारे आणि जोरदार पावसामुळे अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये चांडोली बुद्रुक येथील शेतकरी हरिभाऊ रघुनाथ थोरात वय ७० यांचा नारळाचे झाड अंगावर पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हरिभाऊ थोरात हे त्यांच्या गोठ्यामध्ये असताना अचानक जोरदार वाऱ्यामुळे नारळाचे झाड कोसळले. झाड अंगावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे चांडोली बुद्रुक परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मंगळवारी झालेल्या वादळी पाऊस व वाऱ्यामुळे आंबेगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडून गेले असून जनावरांचे गोठे, कांद्याच्या चाळी, फळबागा तसेच विविध पिकांचे नुकसान झाले आहे. काही भागांमध्ये वीज वितरण यंत्रणेचे खांब कोसळल्याने वीजपुरवठाही विस्कळीत झाला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आणखी मोठे संकट उभे राहिले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासनाने त्वरित पंचनामे करून शासनाकडून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण थोरात पाटील आणि जिल्हा परिषद सदस्या प्रीती प्रवीण थोरात पाटील यांनी केली आहे. तसेच मृत शेतकरी हरिभाऊ थोरात यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. प्रशासनाने नुकसानग्रस्त भागांचा तात्काळ दौरा करून परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## विषारी दारू प्रकरणात मृतांचा खरा आकडा समोर आणावा सीआयडीने थेट लोकांशी संपर्क करणे आवश्यक :आ .डॉ. गोऱ्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विषारी दारू प्रकरणाच्या तपासात मृत्यूंचा आणि बाधितांचा खरा आकडा समोर आणण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्याची गरज असल्याचे मत शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. या प्रकरणाच्या तपासाबाबत माहिती घेण्यासाठी त्यांनी मंगळवारी गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) कार्यालयाला भेट देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. डॉ. गोऱ्हे यांनी सीआयडीचे अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद, पोलीस महानिरीक्षक सुधीर हिरेमठ, पोलीस अधीक्षक शफकत आमना, पोलीस उपअधीक्षक सचिन चव्हाण आणि शामराव काळे यांच्याशी सुमारे ३५ मिनिटे चर्चा केली. यावेळी तपासातील काही त्रुटी, स्थानिक नागरिकांच्या तक्रारी आणि पुढील तपासाची दिशा याबाबत त्यांनी अनेक सूचना मांडल्या. पत्रकारांशी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, ''ज्या व्यक्तींचा विषारी दारूमुळे मृत्यू झाला, त्यांच्याबरोबरच त्या काळात तत्सम लक्षणे असलेल्या रुग्णांचाही शोध घेणे आवश्यक आहे. यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे सहकार्य घ्यावे. त्याचबरोबर त्या कालावधीत संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या नोंदींचीही तपासणी केली जावी.'' त्यांनी सांगितले की, काही व्यक्ती आजारी पडल्यानंतर किंवा मृत्यूनंतर त्यांच्या मूळ गावी परतल्या असण्याची शक्यता आहे. कर्नाटक, लातूर, बिहारसह इतर राज्यांत गेलेल्या व्यक्तींची माहितीही गोळा केली पाहिजे. ''दूरदर्शन, प्रसारमाध्यमे आणि स्थानिक यंत्रणांच्या माध्यमातून आवाहन करून अशा व्यक्तींबाबतची माहिती नागरिकांनी प्रशासनाला द्यावी. काहींना मुद्दामहून गायब करण्याचा प्रयत्न झाला आहे का, याचाही तपास व्हायला हवा,'' असे त्यांनी नमूद केले.

सीआयडीचे संपर्क कार्यालय सुरू करण्याची मागणी: तपासादरम्यान नागरिकांना निर्भयपणे माहिती देता यावी यासाठी पिंपरी-चिंचवड आणि हडपसर येथे सीआयडीचे तात्पुरते संपर्क कार्यालय सुरू करण्याची सूचना आपण केली असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. तसेच तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांचे व्हॉट्सॲप क्रमांक सार्वजनिक करावेत, जेणेकरून नागरिक थेट तक्रारी आणि पुरावे सादर करू शकतील, अशी मागणी त्यांनी केली.

''पूर्वी नागरिकांनी काही निवेदने दिली असतील आणि त्यावर कारवाई झाली नसेल, तर ती माहितीही सीआयडीपर्यंत पोहोचली पाहिजे. त्यामुळे प्रशासनातील हलगर्जीपणा किंवा दुर्लक्ष कोठे झाले हे स्पष्ट होण्यास मदत होईल,'' असे त्या म्हणाल्या. काही वस्त्यांमध्ये दबावाचे वातावरण : हडपसर, फुगेवाडी आणि इतर काही भागांमध्ये नागरिकांवर दबाव आणला जात असल्याच्या तक्रारी समोर आल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. ''लोकांना घाबरविणाऱ्या किंवा तपासात अडथळे निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. काही निलंबित पोलीस अधिकारी स्थानिक पातळीवर हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू शकतात, त्यामुळे त्याबाबतही खबरदारी घेण्याची सूचना मी अधिकाऱ्यांना केली आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

उत्पादन शुल्क विभागासह सर्व यंत्रणांची नैतिक जबाबदारी : उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांच्या कामकाजाबाबत विचारलेल्या प्रश्नावर डॉ. गोऱ्हे यांनी अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात उत्पादन शुल्क विभागाकडे यापूर्वीपासून अवैध हातभट्टी आणि विषारी दारूच्या व्यवसायाची माहिती होती, तसेच संबंधितांवर गुन्हेही दाखल करण्यात आले होते. मात्र त्यानंतरही अशा प्रकारची मोठी दुर्घटना घडल्याने उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे त्यांनी सूचित केले. ''केवळ कारवाई दाखविणे पुरेसे नसते, तर त्या कारवाईचे परिणाम प्रत्यक्षात दिसणेही आवश्यक असते. पूर्वी माहिती असूनही जर अवैध दारूचे जाळे सुरू राहिले असेल, तर त्यामागे नेमकी कुठे त्रुटी राहिली याची चौकशी झाली पाहिजे,

## केबल चोरीचे सत्र सुरूच; वळतीतील शेतकऱ्यांचे हजारोंचे नुकसान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शेतीपंपांच्या केबल चोरीच्या घटनांनी शेतकऱ्यांची झोप उडवली असताना पोलीस प्रशासन मात्र या प्रकारांकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. मागील आठवड्यात नरसिंह बंधाऱ्यावर ५५ शेतकऱ्यांच्या पंपांच्या केबल चोरीला गेल्यानंतरही चोरट्यांचा शोध लागलेला नसतानाच वळती येथील वाळुंजमळा बंधाऱ्यावर पुन्हा १० शेतीपंपांच्या केबल चोरीस गेल्या आहेत.

मीना नदीचे पात्र कोरडे पडल्याने उघड्यावर असलेल्या पंपांवर चोरट्यांची नजर असून रात्रीच्या वेळी सर्रास चोरीच्या घटना घडत आहेत. मात्र सलग घटना घडूनही प्रभावी कारवाई होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. अक्षय बबन भोर, बबन नारायण भोर, विकास मावकर, गुलाब कोंडाजी भोर, शरद भोर, अर्जुन भोर, शांताराम हरिभाऊ भोर, सचिन रामदास भोर, रामकृष्ण भोर आणि रवींद्र नथू शिंदे या शेतकऱ्यांच्या पंपांच्या केबल चोरट्यांनी कापून नेल्या. या चोरीमुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून सिंचन व्यवस्थाही विस्कळीत झाली आहे. एकामागोमाग एक



चोरीच्या घटना घडत असताना चोरटे मोकाट फिरत आहेत, तर पोलीस प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. ''शेतकरी अडचणीत आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे,'' अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली. चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकरी वर्गातून दिला जात आहे.

## आळंदीचे ओंकार कुलकर्णी ज्योतिष भूषण पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** येथील वेदमूर्ती ओंकार सुनील कुलकर्णी यांना वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठानच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'ज्योतिष भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्योतिष क्षेत्रातील अभ्यास, संशोधन व जनजागृतीबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्योतिषाचार्य लक्ष्मीकांत जोशी, डॉ. कुलभूषण मंगळे, वेदमूर्ती भूषण रमेश महाजन तसेच पंचांगकर्ते हर्षद महाजन यांच्या हस्ते कुलकर्णी यांना सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.




पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना ओंकार सुनिल कुलकर्णी म्हणाले, ज्योतिष हे केवळ भविष्य सांगण्याचे माध्यम नसून भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण शास्त्र आहे. या शास्त्राचा सखोल अभ्यास करून समाजापर्यंत त्याचे शास्त्रोक्त ज्ञान पोहोचविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे. मिळालेला हा सन्मान माझी जबाबदारी अधिक वाढविणारा असून भविष्यातही संशोधन व जनप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवणार आहे. या पुरस्कारामुळे आळंदीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, विविध स्तरांतून कुलकर्णी यांचे अभिनंदन होत आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहासाठी वर्पे यांची ५ लाखांची देणगी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** शिक्षणासोबतच सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे जयहिंद आदिवासी आश्रमशाळा, कोळवाडेचे मुख्याध्यापक दशरथ विठोबा वर्पे यांनी आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहासाठी ५ लाख रुपयांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या या योगदानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. माजी शिक्षणमंत्री लोकनेते Balasaheb Thoat आणि माजी आमदार Dr. Sudhi Tambe यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या जयहिंद आदिवासी आश्रमशाळेत आयोजित सेवापूर्ती सोहळा आणि 'सेवाव्रती' या गौरवग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात वर्पे यांनी ही देणगी सेवाभावी ट्रस्टसाठी डॉ. जयश्रीताई थोरात यांच्याकडे सुपूर्द केली. या कार्यक्रमास बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, नाशिक विभागाचे आयकर आयुक्त भरत आंधळे, आदिवासी विकास विभागाचे सेवानिवृत्त अपर आयुक्त सूर्यकांत हिंगोनेकर, दुर्गाताई तांबे, फादर रॉबर्ट डिकोस्टा, दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख, बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून २ ऑक्टोबर १९९४ रोजी कोळवाडे येथे जयहिंद आदिवासी आश्रमशाळेची स्थापना करण्यात आली. शाळेच्या स्थापनेपासून शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या दशरथ वर्पे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थी विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय उत्कृष्ट आदिवासी आश्रमशाळेचा मान मिळविला. शैक्षणिक कार्याबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठीही वर्पे यांनी मोठे योगदान दिले आहे. वृक्षारोपण आणि संवर्धनाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची भावना रुजविली. दंडकारण्य अभियानाचे तालुका समन्वयक म्हणूनही त्यांनी प्रभावी काम केले आहे. गोरगरीब आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासाच्या सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात या उद्देशाने दिलेल्या ५ लाख रुपयांच्या देणगीमुळे वस्तीगृह उभारणीला मोठी मदत होणार आहे.

**जाहीर नोटीस**

**क्र. फौज २/कावि/१६०/२०२६**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद अर्जदार श्री. विष्णू परसराम होळकर रा. मु.पो. सादलगाव, ता. शिरूर, जि. पुणे. यांची आई नामे कै. वेणूबाई परसराम होळकर यांचा मृत्यू दि. २१/१२/२००३ रोजी पत्ता सादलगाव, ता. शिरूर, जि. पुणे (राहत्या घरी) येथे झाला असून अर्जदार यांनी उपविभागीय दंडाधिकारी पुणे, उपविभाग पुणे यांच्या न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३, कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. सदर मृत्यू दि. २१/१२/२००३, मृत्यू ठिकाण सादलगाव, ता.शिरूर, जि. पुणे ( राहत्या घरी) व या बाबतीत इतर कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसह मांडावे. सदर दिवशी कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजुन पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २/६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(विठ्ठल जोशी)**
**उपविभागीय दंडाधिकारी पुणे, उपविभाग पुणे**

ठिकाण :- पुणे
दिनांक :- २/६/२०२६
शिक्का

# 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी'

### अभियानाचा ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते शुभारंभ!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरूर: भावी पिढीला व्यसनाच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी आणि एक निरामय, तणावमुक्त व सुदृढ समाज घडवण्यासाठी राजर्षी शाहू प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य,दक्ष मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य आणि जागृत शोध वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच शिरूर पोलीस ठाण्याच्या सहयोगाने एका भव्य मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. 'व्यसनमुक्त आणि तणावमुक्त महाराष्ट्र अभियान' अंतर्गत ब 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी' या विशेष जनजागृती अभियानाचा शानदार शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय मा. श्री. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते राळेगण सिद्धी येथे करण्यात आला.

हे अभियान शिरूर तालुक्यातील प्रत्येक गावागावांमध्ये पोहोचणार असून, ग्रामीण भागात या वारीला नागरिकांचा उत्तुंग प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक गावात जाऊन ग्रामस्थांना व्यसनमुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा दिली जात आहे. तसेच, संकटसमयी मदतीसाठी असलेल्या 'डायलब ११२' (ळरश्र ११२) आणि महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या 'दामिनी पथका'च्या कार्याबद्दल पोलिस उपनिरीक्षक दिलीप पवार मार्गदर्शन केले. तर व्यसनमुक्ती बाबत राजेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाबाबत अध्यक्ष भगवान श्रीमंदिलकर यांनी माहिती दिली




या अभियानाची प्रमुख ५ पंचसूत्री उद्दिष्टे आहेत.१) व्यसनाधीन व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन करणे.२. शाळा-महाविद्यालयांतून व्यसनविरोधी व गुन्हेगारी प्रतिबंधक प्रबोधन करणे. ३.आरोग्य, योग आणि मानसिक स्वास्थ्य शिबिरांचे आयोजन.४. व्यसनमुक्तांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.५. तरुणांना रोजगारक्षम बनवून विपरीत मार्गापासून रोखणे. या अभियानात विविध शासकीय विभागाचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, ग्राम सखी, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील, सामाजिक संस्था, महिला बचत गट, शिक्षक, पत्रकार आणि स्थानिक गणेश मंडळे मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवणाऱ्या सर्व अंगणवाडी सेविका, ग्राम सखी, आरोग्य सेविका, सेवक,संस्था व शासकीय कर्मचाऱ्यांना प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येत आहे. या प्रसंगी राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष भगवान श्रीमंदिलकर, शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, ग्रामीण रुग्णालय शिरूर (छट्टू क्लिनिक) चे समुपदेशक. राजेश जाधव, बाबुराव पाचंगे, मच्छिंद्र जामदार, अशोक पवार, नगरसेविका सविता राजापूरे बळवंत कुंभार, विवेक जगदाळे, प्रकाश कुंभार, राणी कर्डीले, सविता बोरुडे, डॉ वैशाली साखरे, रेश्मा शेख, पत्रकार अर्जुन बढे , बबन वाघमारे यांच्यासह पोलिस कर्मचारी, नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे सुपेधर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ईनाम वर्ग ६ व भोगवटा वर्ग २ ही सुरेश बगाराम साळवे, रंजना मोहन साळवे, निनाद मोहन साळवे, राहुल मोहन साळवे, सोहम संदिप साळवे, शुभम संदिप साळवे, विद्या हिमांशु कुपकार आणि वर्षा प्रशांत कदम यांचे नावे सातबारा सदरी व ताबेवहिवाटीस असून सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली. सदर शेतजमिन विक्रीकामी जमीन मालक यांनी जितेंद्र सियाराम गुप्ता, विजय सियाराम गुप्ता व गुलाबचंद दुर्गाप्रसाद गुप्ता तिघे रा. डिंभे खुर्द, ता. आंबेगाव, जि. पुणे यांचे बरोबर विक्रीबाबत साठेखत केलेले आहे. सदर जमिन मालकांनी जमिन विक्रीकामी तथा सदर मिळकत जुन्या शर्तीवर / भोगवटदार वर्ग १ करून मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, पोटगी, कुळ, खंड, ताबा, वहिवाट, विसार, साठेखत, विकसन करार, कुलमुखत्यार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत मा. जिल्हाधिकारी सो., जिल्हाधिकारी कार्यालय पुणे १ तसेच मा. तहसिलदार सो. आंबेगाव, घोडेगाव, जि. पुणे यांचे कार्यालयात मुळ कागदपत्रांनीशी खात्री पटवुन दयावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदर जमिन जुन्या शर्तीवर करणेबाबतची कार्यवाही पूर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. सदर मिळकतीचे मौजे सुपेधर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील गट नं. २०१ चे खरेदी विक्री करता सरकारी मुल्यांकन क्षेत्र ००हे ६३ आर भुखंड मिळकतीकरीता रक्कम रू. ६,०५,०००/- आहे.

मा. जिल्हाधिकारीसो. पुणे यांचे कडे सदर शेतजमिन मिळकत जुन्या शर्तीवर / भोगवटदार वर्ग १ करून मागितलेली आहे. शासन परिपत्रक नं. डब्लुटीएन / १०९९/ सीआर/२००९/ल-४ दि. १० मार्च २००० मधील मुंबई गावची वतने नाहीशी करणेबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर गावचे ५ कि. मी. परिसरातील सदरील जमिनी जुन्या शर्तीवर करणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी त्या लेखी स्वरूपात १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी कार्यालय, कुळकायदा शाखा पुणे/तहसिलदार कार्यालय, कुळकायदा शाखा आंबेगाव, जि. पुणे यांना कळवावे.

परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन मिळकत तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका आंबेगाव मे. दुय्यम निबंधक सो. आंबेगाव यांचे हद्दीतील गाव मौजे सुपेधर येथील खाते नं. ७५ वरील जमिन गट नं. २०१ एकुण क्षेत्र ००हे ९६ आर + पोटखराबा ००हे ०२ आर, आकार ००रू. ७८ पैसे पैकी क्षेत्र ००हे ६३ आर, आकार ०० रू. ५१ पैसे.

मंचर, दि. ०२/०६/२०२६

**श्री. आशिष पांडुरंग काजळे,**
**ॲडव्होकेट मु.पो. मंचर,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**
**मो.नं. ९९६०२९१२९९**
शिक्का

द • ख • ल

## श्रीगोंदा तालुक्यात विजेचा लपंडाव; शेतकऱ्यांच्या पिकांचा जीव टांगणीला

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात शेतीपंपासाठी सोडण्यात येणाऱ्या विजेचा कायम खेळखंडोबा सुरू असून शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. आधीच पावसाने दडी मारलेली, त्यात विजेचा लपंडाव सुरू असल्याने रानातील पिकांना पाणी देणे कठीण बनले आहे. अनेक ठिकाणी विहिरींची पाणीपातळी तळाला गेली असून उरलेसुरले पाणी मोटार चालली तरच पिकांपर्यंत पोहोचत आहे. वीजपुरवठा वेळेवर होत नसल्याने शेतकऱ्यांना मध्यरात्री शेतात जावे लागत आहे. वीज कधी येईल आणि कधी जाईल याचा काही नेम नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. काही गावांमध्ये कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने मोटारी सुरू होत नसल्याची समस्या देखील गंभीर बनली आहे. ऊस, डाळिंब, भाजीपाला आणि खरीपपूर्व पिकांना याचा मोठा फटका बसत असून लाखो रुपयांची गुंतवणूक धोक्यात आली आहे. पिकाला पाणी नाही तर शेतकऱ्याच्या डोळ्यातच पाणी, अशी वेळ अनेकांवर आली आहे. महावितरणकडून देखभाल, तांत्रिक बिघाड आणि वाढता भार यांची कारणे दिली जात असली तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा संयम आता संपत चालल्याचे चित्र आहे. प्रशासनाने तातडीने नियोजन करून सुरळीत वीजपुरवठा करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे.

## पत्रकार कुरुमकर, साळवे, गायकवाड यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मान



**लिंपणगाव :** राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धीप्रमुख व जेष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांच्यासह मुख्याध्यापक रामदास साळवे, शिक्षक राजाराम रामभाऊ गायकवाड, यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत नुकतेच प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांनी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याची उतराई होणे ही गावासाठी व आमच्या मित्र मंडळांसाठी अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गर संयोजक रवींद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. याप्रसंगी लोणी व्यंकनाथ येथील रवींद्र चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने सन्मान करून त्यांना पुढील उर्वरित दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. दरम्यान जेष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांनी पत्रकारिता क्षेत्रात २७ वर्ष व छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये शैक्षणिक क्षेत्रात ३८ वर्ष प्रदीर्घ सेवा बजावली. त्याबरोबरच तुळसाई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास साळवे यांनी ३१ वर्ष तर ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेत शिक्षक राजाराम गायकवाड यांनी ३३ वर्षे या तीनही सत्कार मूर्तींनी उत्तम प्रकारे सेवा बजावली या गुणवंत सेवकांचा लोणी व्यंकनाथ ग्रामस्थ व रवींद्र चव्हाण मित्र मंडळाने गौरव करून त्यांच्या कार्यकर्तुत्वावर स्तुती सुमने वाहिली. दरम्यान नंदकुमार कुरुमकर हे शिक्षण संस्थेत सेवेत कार्यरत असताना प्रामाणिकपणे ३८ वर्ष सेवा करताना संस्था, विद्यालय व विद्यार्थ्यांचे सतत हित डोळ्यासमोर ठेवून काम करत असताना त्यांना ज्या गावात नोकरीची संधी मिळाली. तिथे विद्यार्थी, पालक व शाळा प्रशासन यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवून, संस्था व विद्यालयाचा नावलौकिक कसा वाढेल यासाठी त्यांनी आपले भरीव योगदान दिले. तर तुळसाई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास साळवे यांनी विनाअनुदानित सत्वा पासून काम करत असताना विद्यालयाचा नावलौकिक वाढवला. तर ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे राजाराम गायकवाड यांनी उपशिक्षक म्हणून काम करत असताना उत्कृष्ट अध्यापन व जादा तासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भरीव असे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. या सर्व गुणसंपन्न सेवकांचा यावेळी ग्रामस्थ व रवींद्र चव्हाण मित्र मंडळ यांच्या वतीने गुणगौरव करण्यात आला. सूत्रसंचालन सेवानिवृत्त उपशिक्षक एन टी शेलार सर यांनी केले. तर आभार ह भ प भरत काकडे यांनी मानले.

## बाबा महाराज खामकर यांचे कार्य अनुकरणीय : खा. लंके



**निघोज :** गेली सात दिवस बाबा महाराज खामकर यांनी श्रीमद भागवत महापुराण कथेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मार्गदर्शन करीत धार्मिक संप्रदाय वाढविण्यासाठी प्रयत्न केले असून लोकसहभागातून सहभागी झालेल्या निघोज ग्रामस्थांचे धार्मिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात योगदान असल्याचे प्रतिपादन खा. नीलेश लंके यांनी व्यक्त केले आहे. खा. लंके यांनी कपिलेश्वर मंगल कार्यालयात सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेला भेट दिली. यावेळी कथा प्रवक्ते बाबा महाराज खामकर यांचा सत्कार केला. गेली सात दिवसांपासून ही कथा सुरू असून बुधवार दि.३ जून रोजी या कथेची सांगता होणार आहे. सायंकाळी सात ते रात्री साडेनऊ वाजेपर्यंत कथा व त्या नंतर महाप्रसाद गेली सात दिवसांत मोठ्या प्रमाणात या कथेला प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी सोमनाथ महाराज वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सहसचिव विश्वासराव शेटे, विश्वस्त बाळासाहेब लंके, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, दत्तात्रय लंके, दिलीप आबा उनवणे, रामदास लंके, बाबाजी महाराज वरखडे, दत्तात्रय घोगरे, बाबाजी तनपुरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. खा. लंके यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून निघोज ग्रामस्थ सातत्याने वाडी वस्तीवर अखंड हरिनाम सप्ताह तसेच निघोज परिसरात धार्मिक कार्यक्रम तसेच राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची यात्रा असो किंवा देवीचा वर्षभरातील उत्सव यामध्ये सातत्याने लोकसहभागातून देणगी देत मोठ्या प्रमाणात धार्मिक क्षेत्रात कार्यरत राहून योगदान देण्याचे काम करतात आणी हाच मळगंगा मातेचा आशीर्वाद असल्याने हा भाग आर्थिक समृद्धी माध्यमातून अग्रेसर आहे.

वाढदिवस असो की पुण्यस्मरण किंवा कुटुंबातील एखादा धार्मिक कार्यक्रम असो निघोज आणी परिसरातील ग्रामस्थ तसेच मळगंगा देवीचे राज्यातील भावीक सातत्याने मळगंगा प्रसादालयाला देणगी देत असतात. वर्षभरात जवळपास कोट्यवधी रुपयांचे योगदान धार्मिक कार्यात आहे. हीच धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी बाबा महाराज खामकर असोत किंवा ईतर महाराज मंडळी सातत्याने या ठिकाणी येऊन प्रवचन, कीर्तन तसेच कथेच्या माध्यमातून लोकप्रबोधन करण्याचे काम करीत असतात.

# ट्रॅक्टरच्या आवाजाने बिबट्याने सोडली शिकार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

### जेऊर परिसरातील घटना ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नगर तालुका : जेऊर व इमामपूर शिवाराच्या सीमेवरील तोडमल वस्ती परिसरात मंगळवार (दि. ३ ) रोजी रात्री बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सूरज तोडमल हे आपल्या शेतात ट्रॅक्टरद्वारे मशागतीचे काम करत असताना त्यांना अचानक बिबट्या दिसला. त्यावेळी बिबट्या तोडमल यांच्या पाळीव कुत्र्याची शिकार करण्याच्या तयारीत असल्याचे दिसून आले.**



मशागतीसाठी सुरू असलेल्या ट्रॅक्टरच्या मोठ्या आवाजामुळे बिबट्या दचकला आणि त्याने आपल्या भक्ष्याचा पाठलाग सोडून जवळील झुडपांच्या दिशेने धूम ठोकली. त्यामुळे मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्या त्या कुत्र्याला अक्षरशः जीवदान मिळाले. या प्रकारानंतर सुमारे अर्धा तास बिबट्या त्याच परिसरात तळ ठोकून होता.

यापूर्वी जेऊर पंचक्रोशीत बिबट्याच्या हल्ल्यात अनेक पाळीव प्राण्यांच्या शिकारीच्या घटना घडलेल्या आहेत. चापेवाडी, तवले वस्ती, भवानी माता डोंगर परिसर, डोणी, गवारे वस्ती, खंडोबा माळ, पिंपळगाव तलाव, शेटे वस्ती, लिगाडे वस्ती, ठोंबरे मळा, माळखास, धुरकुंड परिसर, खारोळी नदीच्या तीरावर अनेक वेळेस बिबट्याने दर्शन दिले आहे. गेल्या काही महिन्यांपासून बिबट्या निदर्शनास आला नव्हता. परंतु कालच्या घटनेने पुन्हा जेऊर परिसरात दहशतीचे वातावरण तयार झाले आहे.

> मी शेतात ट्रॅक्टरने मशागत करत होतो. अचानक काही अंतरावर बिबट्या दिसला. तो पाळीव कुत्र्याच्या मागे होता. ट्रॅक्टरचा आवाज होताच बिबट्या घाबरून झुडपात निघून गेला. काही क्षणांसाठी अंगावर काटा आला होता. घटनेनंतर सुमारे अर्धा तास बिबट्या त्याच परिसरात ठाण मांडून होता.
> **सुरज तोडमल (शेतकरी)**

जेऊर पंचक्रोशीत असणाऱ्या गर्भगिरीच्या डोंगर रांगांमध्ये बिबट्याचे वास्तव्य नेहमीच आढळून आलेले आहे. जेऊरसह इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी, धनगरवाडी, डोंगरगण, पिंपळगाव माळवी, मांजरसुंबा, खोसपुरी, उदरमल,पांगरमल या परिसरातही बिबट्याकडून पाळीव प्राण्यांच्या शिकारीच्या घटना घडलेल्या आहेत. डोंगर रांगांमध्ये सहज उपलब्ध होणारे अन्न, लपण व पाणी यामुळे बिबट्यांसाठी हा परिसर नंदनवन ठरत आहे.

जेऊर परिसरातील घटनेनंतर वन विभागाच्या वतीने वनपाल मनेष जाधव यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन नागरिकांना दक्षतेच्या सूचना दिल्या. तसेच परिसरात जनजागृती करून बिबट्यापासून काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. बिबट्या दिसल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

> जेऊर परिसरात बिबट्याचा वावर वारंवार आढळून आलेला आहे. नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांची विशेषता लहान मुलांची काळजी घ्यावी. पशुधन बंदिस्त जागी बांधावे. परिसर स्वच्छ ठेवावा. बिबट्या दिसल्यास त्याचा पाठलाग अथवा छेड न काढता वन विभागाशी संपर्क साधावा. वनविभाग बिबट्याच्या हालचालीवर नजर ठेवून आहे.
> **मनेष जाधव (वनपाल, वनविभाग)**

## ‘कायद्याचे’ रक्षकच नियमभंगाच्या भोवऱ्यात?

### प्रसिद्धीच्या नादात पीडित तरुणीची ओळख जाहीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस स्टेशनकडून जारी करण्यात आलेल्या एका प्रसिद्धी पत्रकामुळे मोठा वाद निर्माण झाला असून विनयभंग प्रकरणातील पीडित तरुणीची ओळख जाहीर झाल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. कायद्याचे रक्षकच नियम पायदळी तुडवत आहेत का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

२०१९ मध्ये श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी येथे शेतीच्या वादातून एका तरुणीचा विनयभंग व मारहाण झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात श्रीगोंदा न्यायालयाने आरोपींना दोषी ठरवत नुकतीच शिक्षा सुनावली. मात्र आरोपींना झालेल्या शिक्षेची माहिती देताना श्रीगोंदा पोलिसांकडून जारी

**श्रीगोंदा पोलिसांवर प्रश्नचिन्ह**

करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात पीडित तरुणीचे नाव आणि गावाचा उल्लेख करण्यात आल्याने नवीन वादाला तोंड फुटले आहे.धक्कादायक बाब म्हणजे संबंधित प्रसिद्धी पत्रक पोलीस स्टेशनच्या सोशल मीडिया ग्रुपवर प्रसारित करण्यात आले. कायद्यानुसार विनयभंग, लैंगिक अत्याचार किंवा महिलांवरील संवेदनशील गुन्ह्यांमध्ये पीडितेची ओळख गोपनीय ठेवणे बंधनकारक असताना पोलिसांकडूनच तिची माहिती सार्वजनिक झाल्याने संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे हे प्रसिद्धी पत्रक पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या सहीने जारी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे गोपनीयतेच्या नियमांचे उल्लंघन नेमके कुणाच्या निष्काळजीपणामुळे झाले, याबाबत चर्चा रंगली आहे.विधी तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारे पीडित महिलेची ओळख जाहीर करणे हे गंभीर स्वरूपाचे प्रकरण मानले जाते. कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांच्याकडूनच अशी चूक होणे चिंताजनक आहे, अशी प्रतिक्रिया काही कायदे जाणकारांनी व्यक्त केली.या घटनेमुळे श्रीगोंदा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रसिद्धी मिळवण्याच्या घाईत संवेदनशीलता हरवली का? अशी चर्चा आता तालुक्यात रंगू लागली आहे.

## पाथर्डीत हातभट्टी अड्डा उद्ध्वस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पाथर्डी पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत शंकरवाडी परिसरातील गावठी हातभट्टी उद्ध्वस्त केली. या कारवाईत सुमारे एक लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीतील गोपाळ वस्ती, शंकरवाडी येथील शिवारात अवैधरित्या गावठी दारू निर्मिती सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने आज (दि. ३ जून) सकाळी सुमारे ६ वाजता दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला. या कारवाईदरम्यान जालिंदर दत्तात्रय लोणारे (वय २२, रा. गोपाळ वस्ती, शंकरवाडी, ता. पाथर्डी) हा इसम गावठी दारू निर्मिती करत असल्याचे आढळून आले. घटनास्थळी तपासणी केली असता ७०० लिटर कच्चे रसायन (किंमत ७० हजार रुपये), १५० लिटर तयार गावठी दारू (किंमत ३० हजार रुपये), नवसागरच्या सहा वड्या तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १ लाख ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदर कारवाईत समाजाच्या आरोग्यास घातक ठरणारे कच्चे रसायन जागीच नष्ट करण्यात आले. आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) व (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात पाथर्डी पोलीस सातत्याने कठोर भूमिका घेत असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध यापुढेही प्रभावी कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कल्लुबर्मे, विभागीय पोलीस अधीक्षक नीरज राजगुरू यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव व पोलीस उपनिरीक्षक देवराव ढगे, हेड कॉन्स्टेबल संभाजी कुसाळकर, हेड कॉन्स्टेबल संदीप कानडे, पोलीस कॉन्स्टेबल भगवान टकले, संदीप कळमकर तसेच चालक पोलीस कॉन्स्टेबल गोविंद दराडे होमगार्ड किसन सदामत, ज्ञानेश्वर बडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा!



**लिंपणगाव :** वस्तूंच्या छापील किमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दराने विक्री करून ग्राहकांची होणारी आर्थिक फसवणूक थांबवावी, तसेच देशात 'एमआरपी' संदर्भात सक्षम कायदा करण्यात यावा, या मागणीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनजागृती आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. यावेळी ग्राहकांच्या विविध ज्वलंत समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. भारत सरकारने एमआरपी विषयावर तातडीने सक्षम व सुधारित कायदा करावा. तसेच एमआरपीच्या पडताळणीसाठी एका स्वतंत्र वैधानिक प्राधिकरणाची स्थापना करण्यात यावी.बाजारातील

**अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाधिकार्यांना निवेदन**

वाढीव एमआरपी, खोटी सूट आणि दिशाभूल करणाऱ्या किमतींवर कडक निर्बंध आणले पाहिजेत. वस्तूंच्या किमतीत पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक उत्पादनावर एमआरपी सोबतच त्याचा मूळ उत्पादन खर्च छापणे कायदेशीररित्या बंधनकारक करावे. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या औषध आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमतींवर विशेष नियंत्रण प्रणाली लागू करावी. या आंदोलनात अतुल कुऱ्हाडे, अमिता कोहली, पद्मा दायमा, अशोक शेवाळे, सुरेश रहाणे, जितेंद्र पितळे, सीताराम बोरुडे, हरिभाऊ चौधरी, अप्पासाहेब औटी, शहाजी पांढरे, सुनील गोरे, डॉ. रजनीकांत पुंड, रामचंद्र सुपेकर, संदीप गवळी, सतीश भोईटे आदी सहभागी झाले होते.


## ‘सिस्पे’च्या गोठवलेल्या खात्यांना पुन्हा ‘ब्रेक’

### उच्च न्यायालयाची स्थगिती,खाती कायम गोठलेलीच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात सिस पे फसवणूक प्रकरणात मोठी न्यायालयीन घडामोड समोर आली असून श्रीगोंदा जिल्हा न्यायालयाने गोठवलेली खाती मोकळी करण्याबाबत दिलेल्या आदेशाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे संबंधित बँक खाती पुढील आदेशापर्यंत गोठवलेलीच राहणार आहेत.त्यामुळे फसवणूक प्रकरणात दिलासा फक्त मृगजळ ठरला आहे

श्रीगोंदा तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करा आणि भरघोष परतावा मिळवा यातून तालुक्यातील लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यावर गुन्ह्याची व्याप्ती वाढत गेल्यावर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आल्यावर कारवाईला वेग आला काही लोकांना अटक करण्यात आली सध्या ते जामिनावर बाहेर असून गुन्हे शाखेने त्याचे खाते गोठविण्यात आले होते जिल्हा न्यायालयाचे आदेशाने त्यांची खाती उघडण्यास संमती दिली या निर्णयामुळे सिस पे प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून आर्थिक व्यवहार, गुंतवणूकदारांचे पैसे आणि तपास यावर मोठा परिणाम होणार असल्याची चर्चा सुरू आहे. जिल्हा न्यायालयाच्या



**अनेक एजंट मारहाण ?**

श्रीगोंदा तालुक्यातील आतापर्यन्त दोन एजेंटल मोठ्या प्रमाणात मारहाण करण्यात आली आहे लोक म्हणतात काहीही करा पण आमचे पैसे द्या या भूमिकेवर गुंतवणूकदार कायम असल्यामुळे एजंट यांची चांगलीच पंचायत झाल्याचे चित्र श्रीगोंद्यात पाहण्यास मिळत आहे. झुंजार यांची पाहतायत अनेक जण वाट सिस माध्यमातून णज लोकांना मोठ्या प्रमाणात गंडा घातला गेल्यामुळे याचा मुख्य सूत्रधार झुंजार असल्याची माहिती लोकांना मिळाली असून ते अद्यापही फरार आहेत त्यामुळे ते आल्यावर त्यांना जनतेचा मनसोक्त प्रसाद मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आदेशानंतर संबंधितांना दिलासा मिळाल्याचे चित्र होते; मात्र उच्च न्यायालयाच्या स्थगितीनंतर पुन्हा अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आता गोठविण्यात आलेली सर्व बँक खाते गोठवलेलीच राहणार आहेत पैशांचा खेळ मोठा आणि न्यायालयीन लढाई त्याहून मोठी, अशी प्रतिक्रिया आता श्रीगोंदा परिसरात ऐकायला मिळत आहे.

पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू असून तपास यंत्रणा संबंधित खात्यांतील व्यवहारांचा मागोवा घेत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

खाती मोकळी झाली तर पुरावे आणि व्यवहारांवर परिणाम होऊ शकतो, असा मुद्दा उच्च न्यायालयात मांडण्यात आल्याचीही चर्चा आहे.त्यावरून सिस पेच्या गोठवलेल्या खात्यांना पुन्हा ‘ब्रेक’ लागला असून खाते उघडण्यासाठी उच्च न्यायालयाची स्थगिती मिळाली असून गोठलेली खाती गोठवलेलीच राहणार असल्याची माहिती मिळाली आहे त्यामुळे फसवणूक प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाचा दिलासा फक्त मृगजळ ठरला आहे.

## निवडणूक कामात कसूर : कर्जतच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा

### प्राथमिक शिक्षक आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा समावेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** मतदार याद्या पुनर्निरीक्षण, नव मतदार नोंदणी, घरभेट पडताळणी, मतदार ओळखपत्र वाटप आणि मतदार यादी अद्यावत कामे करताना कर्जत तालुक्यातील दोन बीएलओ यांच्यावर जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्याबद्दल महसुल विभागाकडून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेशवाडीचे प्राथमिक शिक्षक रामकृष्ण मारुती शेटे आणि सिद्धटेक येथील ग्रामपंचायत कर्मचारी ऋषीकेश गणेश भोसले अशी गुन्हा दाखल झालेली सरकारी कर्मचाऱ्यांची नावे आहे.

भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अहिल्यानगर यांच्या आदेशान्वये कर्जत तालुक्यात मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण, नवमतदार नोंदणी, मतदार ओळखपत्र वितरण, मतदार यादी अद्ययावतीकरण व घरभेटींद्वारे पडताळणी आदी निवडणुक संदर्भात कामकाज राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने कर्जत तहसीलदार यांच्या आदेशान्वये बीएलओ म्हणून अनेक सरकारी कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आहे. अनेकांनी यात सक्रिय सहभाग घेत राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी म्हणत ते काम कडक उन्हात देखील पूर्ण केले. मात्र कर्जत तालुक्यातील गणेशवाडीचे प्राथमिक शिक्षक रामकृष्ण मारुती शेटे आणि सिद्धटेक येथील ग्रामपंचायत कर्मचारी ऋषीकेश गणेश भोसले या दोन्ही बीएलओनी मतदार यादीचे सखोल विशेष पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत आवश्यक असलेले बीएलओ लॉगिन सक्रिय करून मतदार

**कामचुकार आणि निवडणूक कामे नाकारणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना मोठा दणका**

निवडणुकीची कामे अथवा मतदान प्रक्रिया राबवताना अधिकारी-कर्मचारी म्हणून नियुक्ती मिळाल्यास ऐन-केन कारणे दाखवत सदरची ड्युटी नाकारणाऱ्या कामचुकार कर्मचाऱ्यांना या महसुल विभागाच्या दणकेबाज कारवाईने चांगलाच धक्का बसला. कर्जत तालुक्यात निवडणुकीचे कामे न केल्याने अशा गुन्हा दाखल होण्याची ही पहिलीच घटना असावी.




पडताळणी, घरभेटी, अर्ज स्वीकारणे, मतदार यादी अद्ययावत करणे, मतदार मॅंपींग करणे तसेच इतर निवडणूक विषयक कामकाज विहित कालावधीत पार पाडले नाही. विशेष या काळात सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर देखील प्राथमिक शिक्षक रामकृष्ण शेटे आणि ग्रामपंचायत कर्मचारी ऋषीकेश भोसले यांना कर्जत तहसीलदार यांनी वेळोवेळी तोंडी तसेच लेखी सूचना दिल्या. त्याची देखील दखल न घेतल्याने अखेर कर्जत महसुल विभागाने बुधवार, दि ३ जून रोजी निवडणूक विषयक कर्तव्यांचे पालन केले नाही तसेच सोपविण्यात आलेली शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास कसूर केली असल्याचा भारतीय लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ३ एन.सी.आर.बी एकीकृत अन्वेषण फॉर्म १ च्या १३४ मधील तरतुदींचा भंग केला असल्याचा गुन्हा शिक्षक रामकृष्ण मारुती शेटे यांच्यावर बाबू होगले मंडळ अधिकारी खेड आणि सिद्धटेक येथील ग्रामपंचायत कर्मचारी ऋषीकेश गणेश भोसले यांच्यावर मंडळ अधिकारी सिद्धटेक रवींद्र बेल्हेकर यांनी दाखल केला.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
गुरुवार दि.४ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# पक्षांतर करणारे आमचे पायाशी लोटांगण घालतील

## शिंदे, पवार पक्ष नसून अमीत शहांचा गट | शिर्डीत संजय राऊत यांचा हल्लाबोल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : भाजप सरकार शेतकरी आणि महाराष्ट्रविरोधी असल्याचे वाटणाऱ्यांचे मातोश्रीवर स्वागत आहे; मात्र पक्षाशी गद्दारी करून गेलेल्यांना सहज प्रवेश मिळणार नाही, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिला. शिर्डी येथे आयोजित जिल्हाव्यापी शिवसेना मेळाव्यात त्यांनी भाजप, शिंदे गट आणि राष्ट्रवादीवर जोरदार टीका केली.

साई किमया गार्डन येथे झालेल्या या मेळाव्यास माजी विरोधी पक्षनेते आंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, संपर्क प्रमुख सुनील शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यापूर्वी राऊत



यांनी पत्रकार परिषद घेतली तसेच श्री साईबाबा समाधीचे दर्शन घेतले. यावेळी श्री साईबाबा संस्थानतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. पत्रकार परिषदेत बोलताना राऊत यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे कौतुक करताना त्यांना जिल्ह्यातील एकमेव एकनिष्ठ काँग्रेस नेते म्हटले.

नगर जिल्ह्यात शिवसेनेची मजबूत मुळे असल्याचा दावा करत त्यांनी पक्षबांधणीवर पुढील अडीच वर्षे भर देणार असल्याचे सांगितले.

'लाडकी बहीण' योजनेवर टीका करताना त्यांनी निवडणुकीत मतांसाठी सरकारी पैशाचा गैरवापर झाल्याचा आरोप केला. महिलांच्या खात्यात पैसे जमा करून मते विकत घेण्याचा प्रयत्न झाल्याची टीकाही त्यांनी केली. भाजप हा शिंदे गटालाच संपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा करत राऊत म्हणाले, भाजप हे स्लो पॉइझन आहे, हे आम्हाला आधीच समजले होते. तसेच शिंदे गट आणि राष्ट्रवादी हे स्वतंत्र पक्ष नसून अमित शाह यांचे गट असल्याची टीका त्यांनी केली.

दरम्यान, खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे मेळाव्यात अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या नाराजीच्या चर्चा रंगल्या. मात्र ते संसदेच्या कामानिमित्त बाहेर असल्याचे राऊत यांनी स्पष्ट केले. मेळाव्यास जिल्हाप्रमुख सचिन कोते, जगदीश चौधरी, राजेंद्र दळवी, संजय शिंदे, अमर कटारी, डॉ. शरद भदे यांच्यासह जिल्हाभरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संग्राम जगताप हिंदुत्ववादी झाले कधी

नगर शहर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आमदार अनिल राठोड यांनी अनेक वर्ष त्या ठिकाणी आमदार होते.आता तेथील आमदार हिंदुत्ववादी कधीपासून झाले असे म्हणत, आ. संग्राम जगताप यांना डिवचले.

## नेवासा येथे अवैध गोमांस विक्रीवर पोलिसांचा छापा; दोघांना अटक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शहरातील नाईकवाडी मोहल्ला परिसरात अवैधपणे गोवंशाची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्यांवर नेवासा पोलिसांनी बुधवारी (दि. ३ जून) धडक कारवाई करत सुमारे ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत नाईकवाडी मोहल्ल्यात अवैधरित्या गोमांस विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी दुपारी सुमारे १.३० वाजता सलीम गणी शेख यांच्या घरावर छापा टाकला. कारवाईदरम्यान घरामध्ये गोवंशाचे मांस तोडून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे २०० किलो गोमांस तसेच कातडी जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत अंदाजे ६८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी जफर बिलाल चौधरी (वय ३५) व सलीम गणी शेख (वय ४५, दोघे रा. नाईकवाडी मोहल्ला, नेवासा) यांच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल अजय कारभारी साठे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ मधील कलम २७१ व ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियमातील कलम ५, ५(क), ९ व ९(अ) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली. या घटनेमुळे परिसरात मोठी चर्चा सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## वाळूची विनापरवाना वाहतूक करणारा डंपर पकडला

### पोलिसांना हिसका देऊन तस्कराचे पलायन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील चिंचबन रस्त्याच्या कडेला असलेल्या नदी पात्रात अवैद्य वाळूची वाहतूक करणाऱ्या ९ लाखाच्या विना क्रमांकाच्या डंपरसह १६ हजार किमतीची वाळू नेवासा पोलिसांनी मंगळवारी मध्यरात्री छापा टाकून जप्त केली असून यातील वाळू तस्करी करणारा चालक मात्र पोलिसांना हिसका देऊन अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला आहे.सदर आरोपीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की नेवासा शहराच्या पश्चिमेस चिंचबनकडे जाणाऱ्या रोडच्या कडेला प्रवरा नदिच्या पात्रात अवैध रीत्या वाहनाद्वारे वाळुची चोरी होत असल्याची बातमी पोलिसांना मिळाली सदर ठिकाणी कायदेशीर कारवाई करा असे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी सांगीतल्याने पो हे काँ काळोखे यांनी दोन पंचांना बरोबर घेवुन त्यांनी शासकीय वाहनात बसुन सदर ठिकाणी मध्यरात्री २ वाजता प्रवरा नदीच्या पात्र परिसरात जाऊन पहाणी केली असता त्यांना एक ढंपर प्रवरा नदीच्या पात्रातुन बाहेर येताना दिसला. सदरचा ढंपर अडवुन ३५ वर्षीय ढंपर चालक काळु शिवाजी आळपे रा. गंगानगर,नेवासा खुर्द ता. नेवासा यास ताब्यात घेऊन नऊ लाख रुपये किमतीच्या डंपरसह चार ब्रॉस वाळू पोलिसांनी जप्त केली.

डंपर चालकास कारवाई साठी ताब्यात घेतले मात्र अंधाराचा फायदा घेत त्याने पोलिसांच्या हाताला झटका मारून तेथून पलायन केले त्याचा परिसरात शोध घेतला असता तो मिळून आला नाही. पो.काँ.सलमान मुक्तार शेख यांनी याबाबत नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीनुसार ढंपर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी ९ लाख रुपये किमतीचा एक विना क्रमांकाचा पुढील बाजूस पांढरा व पाठिमागील बाजुस केशरी रंग असलेला ढंपर, त्यामध्ये असलेली चार ब्रॉस अंदाजे १६ हजार रुपये किमतीची वाळू जप्त केली आहे.फरार आरोपीचा नेवासा पोलीस शोध घेत आहे.

# विहिरीत विवाहितेचा मृतदेह आढळला

## घातपात की आत्महत्या ?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील डोलनर वस्तीवरील विहिरीत एका विवाहित महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. आहे. जिजाबाई काशिनाथ जाधव (वय ४०,रा. मांडवे खुर्द,ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) असे या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहिती अशी की, मांडवे बुद्रुक शिवारातील डोलनर वस्तीवर भिका डोलनर यांच्या शेतात विहिर आहे. या विहिरीत विवाहित महिलेचा मृतदेह असल्याचे काही नागरिकांच्या लक्षात आले. ही माहिती पसरताच शेकडो नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

त्यानंतर घारगाव पोलिसांना माहिती मिळताच सहायक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांच्यासह प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे, महादेव हांडे, सुरेश शेळके, चंद्रकांत मेढे यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती जाणून घेतली. यावेळी पोलिस कर्मचाऱ्यांसह ग्रामस्थांनी बाजाच्या साहाय्याने संबंधित महिलेचा मृतदेह विहिरीतून वर काढण्यात आला. यावेळी पोलिसांनी संबंधित विवाहीत महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला मात्र सदर महिला या परिसरातील नसल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर सदर महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी संगमनेर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. त्यानंतर अवघ्या काही तासांतच सदर महिलेची ओळख पटली.

पारनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील जिजाबाई काशिनाथ जाधव ही महिला रहिवासी आहे. त्यामुळे घारगाव पोलिसांनी पुढील तपासाची चक्रे फिरवली असून सदर महिला विहिरीत कशी पडली? आत्महत्या केली का घातपात आहे का ? याचा तपास घारगाव पोलिस करत आहेत.

## बाभुळगावगंगा येथील वाळूतस्करांच्या गोळीबारप्रकरणी एकास अटक

### स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉ.गायकवाड व दुबिले निलंबित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील बाभुळगाव गंगा परिसरातील गोदावरी नदीपात्रात झालेल्या वाळूतस्करांच्या दोन गटात झालेल्या वाद प्रकरणात एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखा व वीरगाव पोलिसांनी पुणे येथून रविवारी रात्री ताब्यात घेतले. महेश विजय गायकवाड (३६, रा.कोकमठाण, ता.कोपरगाव) असे आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्यास चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मात्र हे गोळीबार प्रकार वेगळे वळण घेतले जाताना पोलीस अधीक्षकांनी याप्रकरणी दोन पोलिसांना निलंबित केले आहे. बाभुळगाव गंगा येथे वाळूतस्करांच्या दोन गटांत वाद झाला होता.यावेळी श्रीरामपूर नगरपरिषदेच्या नगरसेवक अर्जुन दाभाडे यांनी गोळीबार केला होता. या प्रकरणात ९ आरोपींविरुद्ध वीरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील महेश गायकवाड हा आरोपी पुणे येथे नातेवाईकाकडे लपून बसला होता. त्यास जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी बाभुळगाव गंगा प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या काही कर्मचाऱ्यांनी वाळूतस्करांशी संबंध वाढवले होते. ही घटना घडली त्या रात्री बाभुळगाव गंगा गोदावरी नदीपात्रात हजर होते.

त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉ. राहुल गायकवाड व समाधान दुबिले यांना निलंबित करण्यात आले आहे. अटक करून न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून, त्यांना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे. अवैध वाळू तस्करीविरोधातील कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मान्सूनपूर्व सरींनी जीवसृष्टीला आधार

## वन्यप्राणी पशुपक्ष्यांची तहान भागली !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**नगर तालुका** : कडक उन्हाच्या झळांनी होरपळलेल्या नगर तालुक्यातील वनराईला अखेर मान्सूनपूर्व बरसलेल्या सरींनी काही प्रमाणात दिलासा दिला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे कोरडे पडलेले ओढे, नाले, पाणवठे आणि नैसर्गिक जलस्रोत यामुळे वन्यप्राणी व पशुपक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू होती.

तालुक्यातील काही भागात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्याने डोंगर रांगातील खडकांमध्ये असलेल्या नैसर्गिक पाणवठ्यात पाणी साचले आहे. तहानेने व्याकूळ झालेल्या वन्यप्राणी व पशुपक्ष्यांना जणू जीवनदान मिळाले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याच्या शोधात वन्य प्राण्यांना अनेक किलोमीटर भटकंती करावी लागत होती. अनेक पक्षी आणि लहान जीवांना पाण्याअभावी मोठ्या संकटाचा सामना करावा लागत होता. मात्र दोन-तीन दिवसांपासून थोड्याफार प्रमाणात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्याने डोंगरातील खडकांवर असलेल्या खोल भागात पाणी साचले आहे. पाण्याचे डबके, खाचखळगे आणि नैसर्गिक पाणवठे यामध्ये पाणी साचल्याने वन्यजीवांच्या हालचालींमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण झाले आहे. पावसाच्या सरी पडताच पक्ष्यांचा किलबिलाट आणि वनराईतील वाढलेली हालचाल निसर्गप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरत आहे.

ज्या जीवांना उन्हाळ्याने व्याकूळ केले होते, त्यांच्यासाठी हा पाऊस केवळ पाणी नसून जगण्याची नवी आशा घेऊन आला आहे. नगर तालुक्यात वन विभागाचे सुमारे साडेसहा हजार हेक्टर वनक्षेत्र आहे. तसेच खाजगी डोंगर रांगा देखील मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामध्ये हरीण, काळवीट, कोल्हा, लांडगा, तरस, खोकड, ससा, साळींदर, रानमांजर, उदमांजर, रानडुक्कर याचबरोबर बिबट्याचा देखील वावर आढळून येतो तसेच मोर व विविध जातींच्या पक्षांचा मुक्त संचार पाहावयास मिळतो.

गर्भगिरीच्या डोंगर रांगांमध्ये वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वनविभाग, स्वयंसेवी संस्था तर काही गावांनी स्थानिक ग्रामस्थांच्या पुढाकारातून पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येत असते.

परंतु डोंगर रांगातील नैसर्गिक जलस्रोत आटल्याने वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू होत असते. पाण्याच्या शोधात वन्य प्राण्यांचा वावर मानवी वस्तीत आढळून येतो. तालुक्यातील जेऊर पट्ट्यात तसेच इतरत्र झालेल्या मान्सूनपूर्व सरींनी वन्यप्राणी व पशुपक्ष्यांना थोड्याफार प्रमाणात दिलासा मिळाला आहे.



मान्सूनपूर्व पाऊस वन्यजीवांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. जंगलातील नैसर्गिक जलस्रोतामध्ये थोड्या फार प्रमाणात पाणी साचल्याने वन्यप्राणी आणि पशुपक्ष्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे येण्याची गरज कमी होते. या पावसामुळे संपूर्ण जीवसृष्टीला मोठा दिलासा मिळाला आहे.
**मनेष जाधव, वनपाल, वनविभाग**

# भाजप निष्ठावंतांची सोशल मिडियावर असंतोषाची धगधग

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भाजपमध्ये काँग्रेस रष्ट्रवादी काँग्रेस मधील काही नेत्यांना प्रवेश देऊन लगेचच त्यांना विधान परिषदेची उमेदवारी दिल्याने भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आपल्या नाराजीला सोशल मीडियाच्या माध्यमातून असंतोषाला वाट मोकळी करून दिली आहे. यावरून भाजपा अंतर्गत धुसपूस आता यापुढे सर्वांना पाहायला मिळणार आहे. भाजपचे बहुमत असतानाही निष्ठावंतांना डावलून आयात केलेल्या उमेदवारांना विधान परिषदेची उमेदवारी बहाल करण्यात आल्यावरून निष्ठावंत आणि आयात असा भाजपामध्ये संघर्ष सुरू झाला आहे. यासंबंधी सोशल मीडियातून तिखट भावना व्यक्त केल्या आहेत.

सायकलवरून गावा-गावात घरोघरी जाऊन पक्षाचा प्रचार केल्याचा भाजपच्या ग्रूपमध्येच व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये म्हटले आहे, भारतीय जनता पक्षाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच जनसंघापासून ते भाजप स्थापनेनंतरच्या कालखंडात नगर जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवून पक्षाच्या प्रतिकूल परिस्थितीत सायकलवरून गावा-गावात घरोघरी जाऊन पक्षाचा प्रचार केला आहे. त्या काळातील सायकल रॅली, प्रचार फेर्या, आणीबाणीच्या काळात अठरा महिने म्हणजे तब्बल दीड वर्षाहून अधिक काळ नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात अनेक जुने व निष्ठावंत स्थानबद्ध होते.

त्या कटू आठवणी आणि त्या परिस्थितीला व संघर्षाला घरादाराची राखरांगोळी होत असतानाही कसे सामोरे जात पक्ष वाढवला, जिवंत ठेवला ह्या स्मृती आजही जुन्या कार्यकर्त्यांच्या समरणात आहेत. या पार्श्वभूमीवर आजही नगर जिल्ह्यात भाजपचे शेकडो जुने व निष्ठावंत कार्यकर्ते, पदाधिकारी पक्ष संघटनेचे प्रामाणिकपणे निःस्वार्थी वृत्तीने काम करीत असताना भाजपसारख्या पार्टी विथ डिफ्रन्सहे ब्रीद गिरवणार्या पक्ष संघटनेने जिल्ह्यात काँग्रेस-राष्ट्रवादीकडून भाजपात आलेल्या संधी साधू नेत्यांना उमेदवारी दिल्यावरून भाजपाच्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटला आहे.

नगर जिल्ह्यात रक्ताचे पाणी करून पक्ष वाढवला. इतकेच काय तर या सर्व कार्यकर्ते व पदाधिकार्यांची दुसरी-तिसरी पिढी देखील भाजपमध्ये गेल्या अनेक वर्षापासून निःस्वार्थी वृत्तीने कार्यरत आहे. त्यांनाही हेतुपुरस्सर केवळ जुने व निष्ठावंत म्हणून की काय, पण पक्ष संघटनेत डावलले जाते हे या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. जेव्हा फळे चाखायची वेळ आली तेव्हा इतर पक्षातून उमेदवार आयात केले जात आहेत. नगर जिल्ह्यातील भाजपच्या आमदारांची यादी पाहिली तर फक्त चिन्ह भाजपचे आहे, पण माणसे मात्र सर्व इतर पक्षातील आहेत. आज निष्ठावान कार्यकर्ते काही बोलत नाहीत. पण पक्षाला आगामी काळात नक्कीच पश्चातापाची वेळ येईल, असा शापही त्यात देण्यात आला आहे. उद्या सत्ता गेल्यानंतर ही सर्व मंडळी निघून गेल्याशिवाय राहणार नाहीत, अशी उघड उघड प्रतिक्रिया देखील त्यांनी दिली आहे. यामुळे सर्वसामान्य मतदारांची मात्र करमणूक होत आहे.

जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात भाजपाच्या या आयारामांवरून मोठे रणकंदन पेटले आहे. याबाबत भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांसह भाजपाच्या हाय कमांड आणि वरिष्ठ नेत्यांनी देखील ब्र शब्द काढला नाही. भाजपाने जुन्या जाणत्या निष्ठावंत तसेच खस्ता खाल्लेल्या नेते कार्यकर्त्यांना वळीत टाकण्याचा कार्यक्रम आखला असल्याची प्रतिक्रिया भाजपच्या एका जुन्या पदाधिकाऱ्याने दिली. भारतीय जनता पक्षावर आरोप प्रत्यारोप आणि चिखल फेक होत असताना याबाबत प्रतिक्रिया देण्यासाठी मात्र कोणताही वरिष्ठ नेता अद्याप तरी पुढे आला नाही.

## कर्जमाफी योजना शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी : हर्षवर्धन सपकाळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

मुंबई : राज्य सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी योजना ही केवळ दिखाऊ असून, कठोर अटी व निकषांमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करून संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. सपकाळ म्हणाले की, सरकारने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत दिलेल्या व थकीत झालेल्या पीककर्जांनाच कर्जमाफी लागू केली आहे. त्यामुळे यापूर्वीची थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच विहीर, पाईपलाईन, पशुपालन यांसाठी घेतलेल्या कर्जांचाही या योजनेत समावेश नसल्याने अनेक शेतकरी वंचित राहतील. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेले ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदानही कठोर अटींवर आधारित असल्याचे त्यांनी नमूद केले. सलग काही वर्षे कर्ज घेऊन वेळेत परतफेड केल्याशिवाय हा लाभ मिळणार नसल्याने अनेक पात्र शेतकरीही बाहेर राहतील, असे ते म्हणाले. महायुती सरकारचा हेतू जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून दूर ठेवण्याचा असून, ही योजना शेतकरी हिताची नसल्याचा आरोप करत काँग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघर्ष सुरू ठेवेल, असा इशाराही सपकाळ यांनी दिला.

## राज्यपालाच्या पत्नी वर्मा ह्या शनिदरबारी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णु वर्मा यांच्या पत्नी सुधा वर्मा यांनी बुधवारी दुपारी शनिशिंगणापूरला येऊन शनि अभिषेक व तेलाभिषेक करून शनिमुर्तीचे मनोभावे दर्शन घेतले.शनि मंदिरातील संत उदासी महाराज मठात शनी अभिषेक करून चौथाऱ्यावर जाऊन शनिमुर्तीवर तेल अभिषेक केला. देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयात घोडेगावच्या तहसीलदार सोनाली म्हात्रे यांनी त्यांचा शाल व शनि प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी, देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी अनिल दरंदले यांनी देवस्थान राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. शनिमहाराजांच्या दर्शनाने प्रेरणा व ऊर्जा मिळत असल्याने परिसरात आल्यानंतर दर्शनासाठी आले असल्याचे सांगत काही वर्षांपूर्वी शनी दर्शनाकरीता आले होते. तेव्हा व आता शिंगणापूर येथील सुविधा वाढत असल्याचे पाहुन प्रसन्न वाटल्याचे सुधा वर्मा यांनी सांगितले.देशातून येणाऱ्या शनि भक्तासाठी काय काय सुविधा देण्यात येत आहे.यांचीही माहिती देण्यात आली.यावेळी शनिशिंगणापूर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.